दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...




बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे अंक -११ | बुधवार,दि.१७ सप्टेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-11 | Wednesday, Dt.17 September 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# फडणवीस साहेब, अजितदादांमुळे आज रेल्वेचे स्वप्न खऱ्या अर्थाने साकार ! पण मराठवाडा मुक्ती संग्राम दिन, रेल्वेचा शुभारंभ हे महत्त्वाचे क्षण नाहीत का ?

## बोले तैसा चाले, त्यांचे नाव म्हणजे अजित दादा पवार..!

बीड / वैभव स्वामी

परळी वैजनाथ - बीड - अहिल्यानगर हे स्वप्न स्वर्गीय लोकनेत्या केशरकाकू क्षीरसागर, लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्यासह समस्त बीडकरांनी पाहिले. आज हे स्वप्न खऱ्या अर्थाने बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यामुळे पूर्णत्वास जात आहे. हे नक्कीच अभिनंदन आहे. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देवा भाऊ, आज मराठवाडा मुक्ती संग्राम दिन आणि रेल्वेचा शुभारंभ हे महत्त्वाचे क्षण नाहीत का ? या कार्यक्रमाच्या शुभारंभासाठी आपण स्वतः येत असताना सुद्धा शासकीय पातळीवर या संदर्भात जनतेला शुभेच्छा देणाऱ्या शासकीय जाहिराती नाहीत. यामध्ये शासनाची उदासीनता म्हणायची का ? असा प्रश्न मीडियासह सामान्य जनतेला पडला आहे. बोले तैसा चाले त्यांची वंदावे पाऊले हे नक्कीच खरे आहे. दादांनी १७ सप्टेंबर रोजी मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बीडच्या रेल्वेला हिरवा झेंडा दाखवेल. हा शब्द दिला आणि आज तो प्रत्यक्षात उतरत आहे. याबद्दल नक्कीच आम्हाला अभिमान आहे. मात्र शासकीय पातळीवर असलेली उदासीनता याबद्दल नक्कीच खंत आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ऑनलाइन उपस्थिती मध्ये आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते तसेच बीड जिल्ह्याचे पालकमंत्री महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्यासह महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील,पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे, खासदार रजनीताई पाटील, बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांच्यासह बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, माजी मंत्री, माजी आमदार,

(उर्वरीत पान २ वर)



आज रेल्वेचे पाहिलेले स्वप्न पूर्ण होत आहे. बीडकरांनी न पाहिलेले पण दादांनी दाखवलेले विमानाचे स्वप्न देखील नक्कीच पूर्ण होईल. यात शंका नाही. बोले तैसा चाले त्याचे नाव म्हणजे अजित दादा पवार याची प्रचिती आता बीडकरांना हळूहळू येत आहे यात शंका नाही.



### शुभारंभामध्ये शासकीय उदासीनता का ?

मराठवाडा मुक्ती संग्राम दिन आज संपूर्ण मराठवाड्यामध्ये साजरा होत आहे. हैदराबाद स्टेट मधून निजामाच्या जुलमी राजवटी मधून मराठवाडा सहज मुक्त झालेला नाही. यासाठी मोठा संघर्ष मराठवाड्यातील जनतेला करावा लागला. अनेकांना हुतात्मे पत्करावे लागले.असे असताना सुद्धा दुर्दैवाने १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाची शासकीय जाहिरातीच्या माध्यमातून मराठवाड्यातील जनतेला शुभेच्छा देण्याचे औदार्य सरकार दाखवत नाही हीच खरी शोकांतिका आजही आहे. बीडच्या रेल्वेचे स्वप्न देखील एक इतिहास आहे. आज या इतिहासाला सुवर्ण अक्षरात लिहिले जात आहे. मात्र तरीसुद्धा या रेल्वेच्या शुभारंभाच्या शासकीय जाहिरातीच्या माध्यमातून सामान्य जनतेला शुभेच्छा दिल्या जात नाहीत,ही मोठी शोकांतिका नाकारता येणार नाही.

### जातीयवादाच्या विळख्यातून बीडला बाहेर काढण्यात दादांना यश ?

बीड जिल्हा हा जातीयवादाच्या विळख्यात मागील काही घटनांमुळे अडकला होता. वास्तविक हा पुरोगामी विचारांचा जिल्हा असताना देखील या जिल्ह्यामध्ये जातीय तेढ मोठ्या प्रमाणात वाढत होते. यावर अंकुश निर्माण करत विकासाचे नवी पहाट निर्माण करण्यामध्ये बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार हे निश्चितच सक्षम पर्याय ठरले आहेत, यात शंका नाही. पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासन कठोर निर्णय घेत सक्षमपणे जातीयवादाला चारी मुंड्या चित्त करत कामकाज करत आहे. आणि विकास आता जनतेच्या दृष्टीपथात दिसून येत आहे. याबद्दल पालकमंत्र्याचे निश्चितच अभिनंदन आहे.

### पालकमंत्री असलेल्या उपमुख्यमंत्र्यांच्या बीड जिल्ह्यात जिल्हा माहिती अधिकारीच नाही ?

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री असलेले अजित दादा पवार बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत.मात्र दादांच्या पालकत्व स्वीकारलेल्या बीड जिल्ह्यामध्ये जिल्हा माहिती अधिकारी हे प्रभारी आहेत. तर माहिती अधिकारी हे पद रिक्त झाले आहे. शासकीय योजनांची माहिती सामान्य जनतेपर्यंत पोहोचवणारी शासकीय प्रमुख यंत्रणा म्हणजेच जिल्हा माहिती कार्यालय. आज पूर्णवेळ सक्षम अधिकारी नसल्यामुळे अकार्यक्षम ठरत आहे. दुर्दैवाने जिल्हाधिकाऱ्यांना या विभागाला नोटीस बजावण्याची दुर्दैवी वेळ आली आहे. याची दादा आपण किमान गांभीर्याने दखल घ्यावी. मुख्यमंत्री साहेब,दादा पालकमंत्री असलेल्या जिल्ह्याला पूर्ण वेळ सक्षम जिल्हा माहिती अधिकारी आणि माहिती अधिकारी आपण देऊन शासकीय आणि प्रशासकीय कामकाज सामान्य जनतेपर्यंत सक्षम पोहोचवण्यासाठी हा विभाग सक्षम करावा अशी अपेक्षा आहे.

## परळी मतदारसंघासह संपूर्ण बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे मागणी करणार - धनंजय मुंडे



परळी वैद्यनाथ तालुक्यातील अतिवृष्टी व पुराने झालेल्या नुकसानीची धनंजय मुंडे यांनी केली पाहणी

अनेक ठिकाणी पुराचे पाणी शेतात, नदीतील दगड गोट्यांचे पंचनामे कसे करणार?

परळी - परळी वैद्यनाथ मतदारसंघासह बीड जिल्ह्यात सर्वदूर अतिवृष्टी व पावसाने मोठे नुकसान केले आहे. ५०% पेक्षा अधिक खरीप पिके पाण्याने नासून गेली आहेत. बहुतांश भागात शेतात गुडघाभर पाणी साचलेले आहे, तर अनेक ठिकाणी पुराचे पाणी शेतात शिरल्याने शेतात दगड गोट्यांचे खच साचले आहेत, अनेक गावांमध्येही पुराचे पाणी शिरून नुकसान झाले असून, घरांची पडझड, संसारोपयोगी साहित्याचे नुकसान, धान्याचे नुकसान, पशू धनाची हानी, ग्रामीण भागातील रस्ते - पुल तुटणे किंवा वाहून जाणे, संरक्षक भिंती खचने असे अनेक प्रकारचे नुकसान झाले असून, परळी सह संपूर्ण बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून, त्या निकषानुसार मदत जाहीर करावी, अशी मागणी आपण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसेच उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या कडे पत्राद्वारे करणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे परळी तालुक्यात झालेल्या नुकसानीची आज धनंजय मुंडे यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी तालुक्यातील वाण टाकळी, बोधेगाव, मोहा, कावळे वाडी, वंजारवाडी, गर्देवाडी इत्यादी गावांना भेटी देऊन शेती पिकांच्या तसेच अन्य नुकसानीची पाहणी केली. वाण टाकळी गावात नदीचे पाणी शिरल्याने प्रचंड नुकसान झाले असून, स्थानिक आपत्ती निवारण निधीतून संसारोपयोगी साहित्याचे नुकसान झाले असल्यास त्या ठिकाणी तातडीची मदत करण्याच्या सूचना धनंजय मुंडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केल्या.

काही ठिकाणी पुराचे पाणी शेतात शिरल्याने शेतात दगड गोटे तसेच रस्त्याचे

(उर्वरीत पान २ वर)




## पालकमंत्री अजितदादांमुळे, फलोत्पादन विभागाची जागा केज नगरपंचायतला हस्तांतरित



### केज वासियांसाठी आनंदाचा क्षण गटनेते - डॉ. हारुणभाई इनामदार

केज / चंद्रकांत पाटील

केज नगरपंचायत राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) गटनेते डॉ.हारुणभाई इनामदार यांनी मंगळवारी केज येथील शासकीय विश्रामगृहावर पत्रकार परिषद आयोजित केली होती. सदरील पत्रकार परिषदेला गटनेते हारूणभाई इनामदार, नगराध्यक्ष डॉ.सौ. सिताताई बनसोड, नगरसेविका पदमीन अक्का शिंदे,राजू इनामदार,जलालभाई इनामदार व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.या पत्रकार परिषदेत त्यांनी केज शहरातील मोक्याची जिरायत खात्याची जागा केज नगरपंचायतला महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री अजित दादा पवार

(उर्वरीत पान २ वर)



## संपादकीय

# महागाईचा जनतेला हादरा

रिटेल इन्फ्लेशन म्हणजे किरकोळ महागाईचा दर गेले नऊ महिने सातत्याने घसरत होता आणि लोकांनाही हायसे वाटले होते. पण ऑगस्टमध्ये किरकोळ महागाईच्या दरात वाढ झाली आहे आणि हा दर १.६१ टक्के इतका झाला आहे. हा दर किरकोळ वाटू शकतो, पण सध्या जनता ज्या महागाईच्या वणव्यात होरपळत आहे ते पाहता हा दर खूप जास्त आहे. सामान्यतः महागाईचा दर वाढला आहे ते हिरव्या भाज्या आणि मासे तसेच अंडी या आवश्यक वस्तूंच्या किमतीतील वाढीमुळे. नोव्हेंबर २०२४ पासून महागाईचा दर सतत कमी होत होता. पण ऑगस्ट २०२५ मध्ये मात्र अचानक तो वाढला. त्याला कारणे अर्थातच अर्थशास्त्रीय आहेत. आधीच्या उच्च बेस इफेक्टचा परिणाम कमी झाल्यामुळे ही वाढ नोंदवली गेली असा अर्थशास्त्रीय निष्कर्ष आहे, पण सर्वसामान्यांच्या भाषेत सांगायचे तर जनता अगोदरच महागाईने मेटाकुटीला आली होती, त्यात आता या किरकोळ महागाईमुळे ती जेरीस आली आहे. बेस इफेक्ट म्हणजे अगोदरच्या वर्षांपेक्षा या वर्षीत किती किमती बदलल्या आहेत आणि त्या निकषावर महागाईचा फटका जास्त बसत आहे. महागाई चार टक्क्यांवर ठेवण्याचे उद्दिष्ट रिझर्व्ह बँकेला देण्यात आले होते. त्या निकषानुसार पाहिले असता हा महागाईचा दर सामान्यतः आटोक्यात आहे. पण जनतेला या विश्लेषणाची सवय नसते आणि तिला महागाईचे कारण काय याच्या कारणातही काहीही रस नसतो. त्यांना रस असतो तो महागाई किती आहे आणि कोणती स्वस्त वस्तू आहे आणि कोणती महाग आहे यातच. त्या दृष्टीने निश्चितच हा दर चिंताजनक आहे. यंदा पावसामुळे कित्येक धान्ये सडून गेली आहेत आणि कित्येक पिकं तर येण्याची शक्यताच दिसत नाही. या परिस्थितीत धान्य महागाई काही प्रमाणात का होईना पण वाढली आहे. मोदी सरकारसाठी ही भूषणावह बाब नाही. कारण मोदी यांनी सबका साथ सबका विकास असा नारा दिला होता आणि त्यामुळे ते सत्तेवर येताच जनतेला हायसे वाटले होते.

काँग्रेसच्या काळात महागाईने कहर केला होता आणि साध्या गोष्टी जनतेच्या आवाक्याबाहेर गेल्या होत्या. मोदी सरकार सत्तेवर येताच जनतेला 'अच्छे दिन' आल्याची खात्री पटली होती. पण अचानक महागाईच्या दरात किरकोळ का होईना पण वाढ झाल्याचे दिसल्याने जनता त्रस्त आहे. त्यातच आगीत तेल ओतणारे विरोधक विशेष म्हणजे राहुल गांधी यांच्यासारखे विरोधक काँग्रेसचे नेते आणि शिवसेना उबाठाचे नेते याचा गैरफायदा घेणार यात काही शंका नाही. महागाईने अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतो हे पाहिले असता असे लक्षात येते की महागाई ही बाजारात पैसा जास्त प्रमाणात आल्याने वाढते आणि पैसा कमी असल्यानेही वाढते. बाजारात पैसा जास्त झाला तर लोक हवी ती वस्तू मागेल त्या किमतीला खरेदी करतात आणि परिणामी महागाई वाढते. मोदी सरकार महागाईच्या बाबतीत पारदर्शक आहे आणि त्याने आकड्यांची कसलीही लपवालपवी केली नाही. ती काँग्रेसच्या काळात केली जायची. काँग्रेसने जो आरोप केला आहे, की गेल्या दहा वर्षांच्या काळात सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे महागाईमध्ये सातत्याने भर पडली आहे. ती लोकांच्या रोषातून का व्यक्त होत नाही. कारण काँग्रेस खोटे बोलत आहे. जनता जर महागाईने त्रस्त असती तर मोदी सरकार कधीच उलथून पडले असते. पण जनता खुष आहे. त्यामुळे काँग्रेसचा दावा तकलादू आहे. पण हे निश्चित आहे की आता सणासुदीचे दिवस आहेत आणि त्यांच्या तोंडावर महागाईचा दणका जनतेला बसला आहे, खास करून भाज्या आणि अंडी वगैरेची दरवाढ तर असह्य आहे. मोदी सरकार यातून काही तरी उपाययोजना काढेल यात काही शंका नाही. पण ग्राहक किंमत निर्देशांकात सतत नऊ महिने घसरणीनंतर ही वाढ झाली आहे.






# अतिवृष्टीमुळे शेकडो एकर पिकांचे नुकसान

## भाजप नेते सतीश घाटगे यांची अंबड–घनसावंगीतील पाहणी; पंचनामे व तातडीच्या मदतीचे आश्वासन

शहागड /प्रतिनिधी

अंबड व घनसावंगी तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.कपाशी, सोयाबीन,उसासह फळबागा व भाजीपाला पूर्णपणे पाण्याखाली जाऊन नष्ट झाले असून शेकडो एकरांवरील पिके उद्ध्वस्त झाली आहेत.या गंभीर परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी समृद्धी कारखान्याचे चेअरमन व भाजप नेते सतीश घाटगे यांनी सोमवारी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली.

जायकवाडी धरणाचे दरवाजे उघडल्याने गोदावरी नदीला आलेल्या पुरामुळे आपेगाव, बळेगाव,साष्टपी,पळगाव, डोमगाव,गोरी,गांधारी,शहागड, गोंदी,घुंगडे,हादगाव,हँसनापूर, गंगा चिंचोली,कोठाळा, बाणेगाव,भोगगाव आदी गावांतील पिकांचेही प्रचंड नुकसान झाले आहे. पूरस्थितीमुळे अनेक शेतकऱ्यांची घरे कोसळून कुटुंबे उघड्यावर आली आहेत. त्यांना तातडीने तात्पुरता निवारा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, अशी मागणी ग्रामस्थांनी घाटगे यांच्याकडे केली.शेतकऱ्यांच्या समस्या ऐकून घेत घाटगे यांनी अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण व घनसावंगीच्या तहसीलदार पूजा वंजारी यांच्याशी संपर्क साधून तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश दिले.

निसर्गाच्या संकटामुळे शेतकऱ्यांनी खचून न जाता धैर्याने उभारी घ्यावी,असे सांगत त्यांनी प्रशासनाच्या माध्यमातून शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून हक्काची भरपाई शेतकऱ्यांना मिळवून देऊ, असा विश्वास दिला.जायकवाडी धरणाचे सर्व दरवाजे उघडल्याने गोदावरी नदीला मोठा पूर आला असून गोदाकाठच्या गावांना धोका निर्माण होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर घाटगे यांनी गोंदी, गंगा चिंचोली व भोगगाव या गावांना भेट देऊन ग्रामस्थांशी चर्चा केली. त्यांनी कोणत्याही अफवांना बळी न पडता सतर्क राहा,एकमेकांची काळजी घ्या व प्रशासनाच्या सूचनांचे पालन कराअसे आवाहन केले.

या भेटीद्वारे सतीश घाटगे यांनी शेतकऱ्यांना मानसिक आधार देत आपल्या संकटात आपण एकटे नाही, सरकारकडे योग्य भरपाई मिळवून देण्यासाठी मी ठाम प्रयत्न करणार आहे असा दिलासा दिला.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. आर. ए. मिसाळ यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७५५/२०२५**
**सतिष लक्ष्मण पोटफोडे विरूध्द निरंक**
**(मार्फत ॲड ए. आर दानवे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे लक्ष्मण पि. नाथा पोटफोडे हे/हया दिनांक २५/१२/२०२४ रोजी मौजे खळेगाव ता. गेवराई, जि.बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार १) सतिष पि.लक्षमण पोटफोडे वय – ३७वर्षे, धंदा: शेती रा. खळेगाव, ता. गेवराई, जि. बीड, यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत लक्ष्मण पि.नाथा पोटफोडे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १०/०९/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख १८/१०/२०२५

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय घनसावंगी**
**जा.क्र.२०२५ / एम ए जी /कावि–**
**दि.१५.०९.२०२५**

## जाहीर प्रगटन

**श्री प्रदिप रावसाहेब सानप, रा.पिंपरखेड बु.ता.घनसावंगी**
**विषय : कलम १३ (३) जन्म मृत्यू नोंदणी कायद्याप्रमाणे जन्म मृत्यू प्रमाणपत्र मिळणे बाबत तलाठी/ग्रामसेवक मधील जाहीर प्रगटन प्रसिध्द करणे बाबत**

ज्या अर्थी, अर्जदार नामे. श्री. प्रदिप रावसाहेब सानप रा. पिंपरखेड बु. ता. घनसावंगी जि. जालना येथील रहिवाशी असून अर्जदार यांनी त्यांचा भाचा/मुलगी:– अधिराज रामेश्वर मुळे यांची त्यांनी जन्म नोंद/मृत्य नोंद ची यांची जन्म दिनांक :–२०/०९/२०१९ रोजी पिंपरखेड बु. येथे जन्म झाला असल्याचे अर्जात नमुद केले असून, त्या अनुषगाने त्यांनी जन्म प्रमाणपत्र आदेश मिळणे साठी त्यांनी तहसिल कार्यलय घनसावंगी या न्यायालयात / अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी, सदर जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंद बाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास है जाहीर प्रगटन प्रसिध्दी झाल्यापासुन ३० दिवसाच्या जात लेखी स्वरुपात सादर करावा जर नमूद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप या कार्यालयास प्राप्त झाला नाही तर संबंधित प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल यांची नोंद घ्यावी.

आज दिनांक :– १५/०९/२०२५ रोजी माझया सहीने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले जाते.

**स्वाक्षरित/–**
**तालुका दंडाधिकारी,**
**घनसावंगी**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ७६७/२०२५**
**हौसाबाई मुरलीधर कोठी – विरुध्द – निरंक**
**(मार्फत–ॲड. ए एस धोत्रे)**

अर्जदार
१.हौसाबाई मुरलीधर कोठी वय ७९ वर्षे धंदा – घरकाम
रा. साठेवाडी ता. गेवराई जि. बीड
२. हरिभाउ मुरलीधर कोठी
वय ४८ वर्षे धंदा – शेती
रा. साठेवाडी ता. गेवराई जि. बीड
३.लखु मुरलीधर कोठी
वय ४६ वर्षे धंदा – शेती
रा. साठेवाडी ता. गेवराई जि. बीड

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे मुरलीधर आबा कोठी ग. साठेवाडी ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख : १२.११.२०२५

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय घनसावंगी**
**जा.क्र.२०२५ / एम ए जी /कावि– ०२**
**दि.१२.०९.२०२५**

## जाहीर प्रगटन

**कलम १३ ( ३ ) जन्म – मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत.**

सर्व जनता मौजे **सौंदलगाव ता. घनसावंगी** यांना जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते **श्री पठाण मुजाहिदखाँ मन्सुरखाँ रा.सौंदलगांव ता.घनसावंगी जि.जालना** येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन नामे **श्री/श्रीमती/कु/कुमारी:– पठाण मुजाहिदयाँ मन्सुरखाँ** यांची त्यांनी – जन्म ची दिनांक :– **२८/०६/१९९९** ही दर्शविलेली आहे अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर / हरकती/आक्षेप / आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २२/०८/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्का निशी जाहीर करण्यात आले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तालुका दंडाधिकारी,**
**घनसावंगी**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–४९८ दि.१०.०९.२०२५**

## जाहिर प्रगटन

**(जन्म–मृत्यूची नोंदी सुधारणा अधिनियम, २०२३)**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **बाबासाहेब कमळाजी ठाकरे रा. टाका ता.अंबड जि. जालना** यांनी तहसील कार्यालय अंबड येथे त्यांच्या **नामे संगिता बाबासाहेब ठाकरे, मुलगी** च्या **दि. ०४/०५/१९९० पंचायत कार्यालय टाका नगर पंचायत कार्यालय टाका** यांचे जाहिर प्रगटन आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यासाठी पाठवित आहेत. तसेच मा. सचिव (१) महाराष्ट्र शासन यांचेकडील शा. निर्णय जमनों २५२५ (ई. ऑ. ९९११८१) प्र.क्र.२२/कु.क. दि.१२/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये जाहिर प्रगटन हे अर्जदराच्या खर्चाने प्रसिध्द करावे असे नमुद केलेले आहे.

त्यामुळे संबंधित अर्जदार यांचेकडून जाहिर प्रगटन प्रसिध्द करणे कामीचा खर्च स्विकारण्यात यावा. तसेच जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्याबाबतची कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. व प्रसिध्द केलेले जाहिर प्रगटनाबाबतचे दोन पेपर या कार्यालयास पाठविण्यात यावे. जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन १५ दिवसाच्या आत आक्षेप या कार्यालयास लेखी स्वरुपात सादर करावा.

सोबत:– जाहिर प्रगटन

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

पान १ वरून...

**फडणवीस साहेब, अजितदादांमुळे ..**

प्रशासकीय अधिकारी, रेल्वे आंदोलन समिती, रेल्वे प्रेमी नागरिक आदींच्या प्रमुख उपस्थितीमध्ये अंमळनेर भांड्याचे ते बीड या नवीन रेल्वे मार्गाचे आणि बीड ते अहिल्यानगर या रेल्वेला हिरवा झेंडा दाखवण्याचा शुभारंभ बीड येथील रेल्वे स्थानकामध्ये दुपारी एक वाजता संपन्न होणार आहे.

बीडला रेल्वे यावी हे स्वप्न मागील ४० वर्षापासून बीड जिल्ह्यातील तमाम लोकप्रतिनिधींसह बीडच्या जनतेने पाहिलेले आहे. या स्वप्नपूर्तीसाठी स्वातंत्र्यसैनिक रेल्वे आंदोलन समिती तसेच रेल्वेसाठी अनेक संघटना, आंदोलनकर्त्यांनी आपले अमूल्य योगदान दिले आहे. ४० वर्षाचा हा संघर्ष आज खऱ्या अर्थाने पूर्णत्वास जात आहे. भलेही हा रेल्वेचा अर्धा टप्पा आज पूर्ण होत असला तरी सुद्धा बीड ते परळी हा रेल्वे मार्ग लवकरच पूर्णत्वास जाणार आहे. यात आता शंका नाही. अजितदादांच्या भूमिकेमुळे बीड ते परळी या रेल्वे मार्गाच्या कामासाठी सुमारे दीडशे कोटी रुपये महाराष्ट्र शासनाने नुकतेच दिले आहेत. त्यामुळे आता या कामाला अधिक गती मिळणार आहे यात शंका नाही.डिसेंबर अखेरपर्यंत हा रेल्वे मार्ग देखील पूर्ण होईल, यात कसलेही दुमत नाही.

बीड जिल्ह्याच्या विकासाने आता अजितदादांच्या पालकत्वामध्ये गती घेतली आहे. यात कसलीही शंका नाही आता अजितदादाच पुढील कार्यकाळ संपेपर्यंत बीड जिल्ह्याचे पालकमंत्री राहावेत आणि त्यांच्या कालावधीमध्ये बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास व्हावा अशाच सर्वसामान्य जनतेच्या अपेक्षा आहेत.

पोलीस खात्याला आडनाव लपवावे लागते हा अभिमान नव्हे अपमान ?

महाराष्ट्रामध्ये एकमेव बीड जिल्ह्यामध्ये पोलीस विभागाला आपले आडनाव लपवून कामकाज करावे लागत आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवाभाऊ ही बाब बीड जिल्ह्यासाठी अभिमानास्पद नक्कीच नाही तर ती अपमानास्पद आहे. आडनाव लपवण्यापर्यंत जर पोलीस प्रशासनावर दुर्दैवी वेळ येत असेल तर ही वेळ आता संपली पाहिजे. यासाठी आपण निर्णय घेणे गरजेचे झाले आहे. लपवलेले आडनाव पुन्हा एकदा अभिमानाने पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्या छातीवर गर्वाने आले पाहिजे. आणि त्यांनी सक्षमपणे सामान्य जनतेत आपल्या आडनावा सह जाऊन काम केले पाहिजे. जर असे भविष्यात घडले तरच बीड जिल्ह्याचे परिवर्तन घडले असे म्हणता येईल ? यासाठी गृहमंत्री देवा भाऊ आपण तात्काळ निर्णय घ्यावा अशी सामान्य बीडकरांची आपल्याकडून अपेक्षा आहे.

**परळी मतदारसंघासह संपूर्ण बीड...**

डांबर वाहून आले आहे, अशा परिस्थितीत नेमका कसा पंचनामा करणार, असा प्रश्न मुंडेंनी उपस्थित केला.

दरम्यान नुकसान झालेले रस्ते, पुल इत्यादींच्या दुरुस्तीचे प्रस्ताव तातडीने दखल करण्याबाबत धनंजय मुंडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या. दरम्यान या भागातील सोयाबीन, कापूस, तूर, मूग, ऊस यांसह पिकांचे मोठे नुकसान झाले असून, खरिपात शेतकऱ्यांच्या हाती काहीच लागणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे आता ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी करणार असल्याचे श्री मुंडे म्हणले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, बालाजी (पिंटू) मुंडे, विष्णुपंत सोळंके, विष्णुपंत देशमुख, मोहनराव सोळंके, प्रदीप (बबलू) मुंडे, माऊली तात्या गडदे, माऊली मुंडे, भानुदास डीघोळे, ज्ञानोबा सलगर, अंगद मुंडे, राजाभाऊ हांगे, तुकाराम मुंडे, अभिमन्यु गडदे, अशोकराव दिघोळे, फुलचंद चाटे, बलभीम शेरकर, नमाजी गडदे त्याचबरोबर

पान १ वरून...

उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांसह तालुका कृषी अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता, महावितरणचे अभियंता यांसह मंडळ अधिकारी आदी उपस्थित होते.

**पालकमंत्री अजितदादांमुळे, ...**

यांच्या शिफारशी नुसार हस्तांतरित झाली असल्याची माहिती दिली.

केज शहरातील व्यापाऱ्यांना यामुळे व्यापारी संकुलाच्या माध्यमातून स्वस्त दरात नगरपंचायत कडून गाळे व दुकानासाठी जागा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. केज शहरातील नागरिकांची व व्यापारी वर्गांची ही अनेक दिवसापासून प्रमुख मागणी होती.यामुळे केजशहरात जागोजागी गटनेते डॉ.हारूणभाई इनामदार,नगराध्यक्षा डॉ.सौ.सिताताई बनसोड यांचे जागोजागी स्वागत करण्यात आले.फलोत्पादन विभागाची जागा केज नगरपंचायत ला वर्ग व्हावी म्हणून स्व.विमलताई मुंदडा, खा.सौ.रजनीताई पाटील, खा.बजरंगबप्पा सोनवणे,जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा काकाजी,जेष्ठ नेते रमेशराव आडसकर, अंकुश अण्णा इंगळे, सर्व पक्षीय नगरसेवक, पत्रकार बांधव व केज शहरातील नागरिकांनी मोलाचे योगदान दिल्याचे गट नेते डॉ. हारुणभाई इनामदार यांनी नमूद केले. लवकरच बीडजिल्ह्याचे पालकमंत्री व महाराष्ट्राचेउपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या माध्यमातून जागा अधिग्रहित करून सदरील जागेवरील एकअतिक्रमणे हटवून त्या जागी भव्य व्यापारी संकुल उभा केले जाईल असा विश्वास गटनेते डॉ.हारुणभाई इनामदार यांनी व्यक्त केला.केज नगरपंचायतला महाराष्ट्र शासनाच्या या निर्णया मुळे १०० बाय १००० स्केअर फुट,दहा एकर चाळीस आर क्षेत्र जागा क्रीडा संकुलासाठी व इतर कामासाठी मिळाली आहे.महाराष्ट्र शासनाच्या वरील निर्णयामुळे केजच्या विकासात मोलाची भर पडणार आहे हे निश्चितपणे दिसणार आहे.केज शहरातील नागरिकांनी याबद्दल आनंद व्यक्त केला आहे तसेच नगराध्यक्षा डॉ. सौ.सिताताई बनसोड, गटनेते डॉ.हारुणभाई इनामदार यांचे अभिनंदन केले आहे.

# बिंदुसरा नदीच्या पुरामुळे व अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या पडझड झालेल्या घरांचे दुकानांचे पशुधनाचे तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत द्या– शेख निजाम

बीड प्रतिनिधी बीड जिल्ह्यात मागील पावसाळ्याच्या हंगामामध्ये अत्यंत संततधार पाऊस सुरू असल्यामुळे बीड जिल्ह्यातील अनेक लहान मोठे प्रकल्प तुडुंब भरलेले आहेत व नद्या नाले ओसंडून वाहत आहे एक–दोन दिवसापासून बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी होऊन शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झालेले आहे त्यांचे उभे पिक हातातून गेलेले आहे बीड शहराच्या मध्यवर्ती भागातून बिंदुसरा नदी वाहते मागील एक दोन दिवसापासून पडणाऱ्या संततधार पावसामुळे बिंदूसरा नदीला पूर आलेला असून त्यामुळे व अतिवृष्टीमुळे विशेषता बीड शहराच्या मोमीनपुरा परिसर, खासबाग परिसर , बालेपिर



बांगरणाला परिसर, लेंडी नाला परिसर, सेंटर नाला इत्यादी भागात मोठ्या प्रमाणात घरांमध्ये दुकानांमध्ये पाणी शिरलेले आहे त्यामुळे मोठ्या प्रमाणात नागरिकांचे व्यवसायिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे यामध्ये अनेक पशुधन मृत्युमुखी पडल्याचे दिसत आहे या भागातील अनेक घरांची पडझड झालेली असून शासनाने याचे त्वरित पंचनामे करून संबंधितांना मोबदला व आर्थिक मदत करण्यात यावी अशी विनंती महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री मा. ना. अजित दादा पवार साहेब यांच्याकडे केलेली असून शासनातर्फे भरीव मदत बिंदुसरा नदीच्या पुराच्या पाण्यामुळे व झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या नागरिकांना मिळणार आहे असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शेख निजाम,शेख अमर, खय्युम इनामदार,मोमीन जुबेर, सय्यद आजम,शेख हमीद,शेख नसिर,शेख सत्तार इनामदार, शेख खदीर,शेख फारूक,शेख जाकीर यांनी निवेदनात म्हटले आहे

**जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/३९५**
**कार्यालय नगर परिषद, अंबड**
**दिनांक :–१५/०७/२०२५**

## कार्यालय नगर परिषद, अंबड

अर्जदार श्री./सौ.श्रीमती :– १) उषा अशोक पालवे,२) छाया अंकुश पालवे.

प्रकरण :– सर्व्हे नं.–३४/२ सहान प्लॉट नं.–४ न.प.मि.नं.–१८–९१–४ चे हस्तांतर करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र.(१८–९१–४) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला ------------------- येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

**चतु:सिमा:**
पुर्व :– प्लॉट नंबर – ५
पश्चिम :– सर्व्हे नं.– ३४/२
दक्षिण :– ०९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तर :– बाबुराव नाना वराडे यांची जमीन

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

# कामचुकार अधिकार्यांना खा. डॉ. कल्याण काळेंचा झटका!

## दिशा समितीच्या बैठकीला गैरहजर अधिकारी कर्मचार्यांना कारणे दाखवा नोटीसखाली; विकासकामे रखडविणाऱ्यांवर चौकशी व कठोर कारवाईचे आदेश

फारुक शेख :- सर्वसामान्य जनतेची आडवणूक करणार्या आणि विविध योजनेचे प्रस्ताव प्रलंबीत ठेवणार्या कामचुकार अधिकार्यांचा खा. डॉ. कल्याण काळे यांनी चांगलाच समाचार घेतला असून काम न करणार्या आणि बैठकीला गैरहजर राहणार्या अधिकार्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देश खा. डॉ. कल्याण काळे यांनी दिलेत. जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती (दिशा) चे अध्यक्ष तथा खासदार डॉ. कल्याण काळे यांनी सोमवार दि. १५ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात बैठक घेतली. यावेळी खासदार डॉ. काळे बोलत होते. बैठकीला सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, आमदार नारायण कुचे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नु पी.एम., अपर जिल्हाधिकारी रिता मैवार, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुनिल पठारे, यांच्यासह समिती सदस्य यांची यावेळी उपस्थिती होती. यावेळी खा. डॉ. कल्याण काळे यांनी जल जीवन मिशन, महावितरण, ग्रामीण पाणीपुरवठा योजना, प्रधानमंत्री आवास योजना, राष्ट्रीय आरोग्य अभियान, महिला व बालविकास, कामगार विभाग, महाराष्ट्र जिवन प्राधीकरण, जिल्हा कौशल्य विकास प्रशिक्षण, एमएसआरएलएम, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनांसह विविध विभागाच्या योजनेचा आणि सध्या स्थितीत सुरु असलेल्या कामाचा आढावा घेतला. दरम्यान जलजीवन मिशन आणि कामगार विभागाच्या अनुषंगाने कोणताच विषय विषयपत्रिकेवर दिसून आला नाही. त्यामुळे खा. डॉ. कल्याण काळे यांनी तो विषय निदर्शनास आणून दिला. शिवाय मागील दिशा समितीच्या बैठकीतील काही विषय देखील प्रोसिडींगला घेतले नसल्याचे खा. काळे यांच्या लक्षात आले. त्यावरुन त्यांनी अधिकार्यांना चांगलेच धारेवर धरले.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची चौकशी लावा गेल्या काही दिवसापुर्वी झालेल्या दिशा समितीच्या बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या चौकशीचा विषय पुढे आला होता. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची चौकशी लावण्याचा विषय प्रोसिडींगमध्ये घेण्यास सांगीतले होते. परंतु, चौकशीचा विषयच प्रोसिडींगमधून वगळण्यात आला. त्यामुळे खा. डॉ. कल्याण काळे यांनी संताप व्यक्त करुन पुन्हा तो विषय प्रोसिडींगला घेऊन चौकशी करण्याच्या सुचना केल्या.

एकाच कुटूंबात घरकुलाचा लाभ देणारे गटविकास अधिकारी यांची चौकशी करा

दरम्यान जालना जिल्ह्यातील काही पंचायत समितीच्या गटविकास अधिकार्यांनी नवरा, बायको, मुलगा अशा पध्दतीने एकाच घरात अनेक घरकुलाचा लाभ दिल्याचे आढळून आले, त्यावेळी अंबड पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी पदी उदय राजपूत होते, सध्या ते उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत विभाग जिल्हा परिषद म्हणून कामकाज पाहत आहेत. त्यामुळे तत्कालील गटविकास अधिकार्याची चौकशी करुन अहवाल पुढील बैठकीत ठेवण्याचे निर्देश खा. डॉ. कल्याण काळे यांनी दिले.

कामे न करता बीले उचलणार्यावर कारवाई



या बैठकीत काही तक्रारीही झाल्या. कामे न करता बीले उचलण्यात आल्याचे दिशा समितीच्या निदर्शनास आणून दिले. त्यावर एक समिती गठीत करुन चौकशी करुन कारवाई करण्याच्या सुचना खा. डॉ. कल्याण काळे यांनी दिल्या.

यांच्यावर कारवाईच्या सुचना दिशा समितीच्या बैठकीसाठी अनेक अधिकार्यांनी दांडी मारली. त्यामध्ये सर्वच तहसिलदार आणि जलसंपदा विभागाच्या अधिकार्यांचा समावेश होता. सदरील विभागाच्या अधिकार्यांवर तातडीने कठोर कारवाई करण्याच्या सुचना खा. डॉ. कल्याण काळे यांनी दिल्या. त्यावर जालना तहसिलदार वगळता इतर सर्व तहसिलदार आणि जलसंपदा अधिकार्यांना कारणे दाखवा नोटीस बाजवली जाणार आहे.

प्रस्ताव नाकारणार्या आणि प्रलंबीत ठेवणार्याची चौकशी जनतेच्या कामावर विशेष लक्ष देत खा. डॉ. कल्याण काळे यांनी विविध विभागाच्या विविध योजनेतील लाभार्थ्यांच्या प्रलंबीत प्रस्तावचा आणि नाकारलेल्या प्रस्तावाचा आढावा घेतला. त्यात सन २०२२ ते २०२४ पर्यंत जाफराबाद आणि भोकरदन तालुक्यात एकही विहीर का मंजुर करण्यात आली नाही. तसेच अंबड आणि घनसावंगीतील काही योजनेचे प्रस्ताव का नाकारण्यात आले असा सवाल खा. डॉ. कल्याण काळे यांनी उपस्थित केला. त्यावर अधिकार्यांना समर्पक उत्तरे देता आली नाहीत. कोणतेही प्रस्ताव विनाकारण नाकारु नका, जनतेला त्रास देऊ नका, योजनेचा सर्वांना लाभ द्या असे निर्देश खा. डॉ. कल्याण काळे यांनी दिलेत.

काम न करणार्या एजन्सीला काळ्या यादीत टाका

या बैठकीत जलजीवन मिशन आणि महावितरण विभागाचे कामे रखडल्याचे दिशा समितीच्या लक्षात आले. त्यामुळे कामे न करता बीलं उचलणार्या आणि कामं प्रलंबीत ठेवणार्या एजन्सीवर कारवाई करा, दंडात्मक कारवाईवर देखील काम होत नसेल तर त्यांना काळ्या यादीत टाका असे खा. डॉ. कल्याण काळे आणि आमदार नारायण कुचे यांनी संबंधिक विभागाला सुचविले. दरम्यान लोकहिताची विकास कामे करतांना प्रशासकीय अधिकार्यांनी लोकप्रतिनिधींच्या कुठल्याही दबावाला बळी न पडता जिल्ह्यातील ग्रामीण रस्त्यांच्या कामासह इतरही कामे तातडीने सुरु करुन वेळेत पुर्ण करावीत. ग्रामीण रस्ते हे गावातील गावकरी व शेतकर्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे रस्ते असून त्यांच्यासाठी ही कामे प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना खासदार डॉ.काळे यांनी संबंधित अधिकार्यांना दिल्या. जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतील कामामध्ये बराच कालावधी उलटल्यानंतरही कोणतीच प्रगती झाली नसून, या कामांमध्ये होत असलेल्या दिरंगाईबद्दल खासदार डॉ.काळे यांनी संबंधित विभागाच्या अधिकार्यांबाबत नाराजी व्यक्त केली. तसेच या योजनेतंर्गत काही गावात झालेल्या कामांची गुणवत्ता तपासणी करण्यात यावी, असे आदेशही त्यांनी दिले. प्रधानमंत्री आवास योजनेतील शहरातील व ग्रामीण भागातील दिल्या जाणार्या अनुदानाच्या फरकाबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातंर्गत स्वयं सहायता गट स्थापन झालेल्या बचतगटांना बँकांकडून निधी मिळण्यास येणार्या अडचणी दूर कराव्यात. अशी सुचनाही खासदार डॉ.काळे यांनी केली. बैठकीत समितीचे अध्यक्ष डॉ.काळे यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजना,राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता योजना, स्वच्छ भारत मिशन, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण ज्योती योजना, राष्ट्रीय आरोग्य अभियान, सर्व शिक्षा अभियान, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, मध्यान्ह भोजन योजना, संजय गांधी निराधार योजना, डिजीटल भारत, सर्व शिक्षा अभियान, जल जीवन मिशन, उमेद, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, महावितरण, स्वामित्व हक्क, राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विविध लाभाच्या योजना आदी योजनांचाही यावेळी आढावा घेतला. जालना महानगर पालिकेच्या हद्दीतील प्रॉपर्टी कार्डच्या कामासह इतर कामांबाबतही दिशा समितीचे अध्यक्ष तथा खासदार डॉ काळे यांनी विविध सुचना केल्या. केंद्रीय योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी दिशा समिती काम करत असते. यात एकूण २३ विषय समाविष्ट आहेत. केंद्राच्या विविध योजना तालुकास्तरावर प्रलंबित न ठेवणे तसेच विकास कामात दिरंगाई झाल्यास तपासणी करणे आदी कामे दिशा समितीकडून करण्यात येत असते. तसेच जिल्ह्यातील बेघर असणार्या गरजु लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ प्राधान्याने देण्यात येईल. अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली.




## गोदाकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे – शहागड सर्कल अध्यक्ष नजीर शहा यांचे आवाहन

शहागड /प्रतिनिधी

जायकवाडी धरणाच्या वरच्या भागात नाशिक,नगर,गंगापूर परिसरात संततधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरू आहे. त्यानुसार सध्या जायकवाडी धरणातून तब्बल १ लाख १८ हजार क्यूसेक पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे.या पार्श्वभूमीवर शहागड परिसरातील गोदाकाठच्या गावांना सतर्क राहण्याचे आवाहन भारतीय जनता पार्टी शहागड सर्कल अध्यक्ष नजीर शहा आणि कार्यकर्ते आप्पासाहेब पवार यांनी केले आहे.धरणाच्या उर्ध्व भागात असलेली सर्व लहान-मोठी धरणे १००% क्षमतेने भरली असून त्यांचा विसर्ग थेट जायकवाडीत येत आहे. त्यामुळे नाथसागरातील पाणीपातळीत सातत्याने वाढ होत आहे. प्रशासनाने सांगितले की,सद्यस्थितीत पूर परिस्थिती नियंत्रणात आहे. मात्र उर्ध्व पाणलोट क्षेत्रात आणखी पाऊस झाल्यास विसर्गात टप्प्याटप्प्याने वाढ करावी लागेल.शहागड परिसरातल्या गोदावरी नदीपात्रातील कोल्हापुरी बंधारा धोक्याच्या पातळीवर जाऊ शकतो अशी शक्यता वर्तवली जात आहे.त्यामुळे नदीकाठच्या गावातील नागरिकांनी खबरदारी घ्यावी पाण्याजवळ अनावश्यक वावर करू नये तसेच प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे असे आवाहन करण्यात आले आहे.आप्पासाहेब पवार म्हणाले की, जायकवाडी व निम्न दुधना प्रकल्पातून विसर्ग नियंत्रित ठेवण्याचा प्रशासनाचा प्रयत्न असला तरी पावसाची तीव्रता वाढल्यास विसर्ग वाढवावा लागेल. त्यामुळे गोदाकाठच्या गावांनी सतर्क राहून सुरक्षिततेची काळजी घ्यावी हीच वेळेची गरज आहे.



## जिंतूर तालुक्यातील मानधानीत अती पाऊस; शेतकरी पिकांचे मोठे नुकसान

जिंतूर (प्रतिनिधी )जिंतूर तालुक्यातील मौजे मानधानी परिसरात १४ सप्टेंबर, रविवार रोजी सकाळी सुमारे ८ ते १० वाजेच्या दरम्यान अचानक ढगफुटीसदृश्य पाऊस झाल्याने शेतशिवारात पाणी साचून शेतकरी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः सोयाबीन, कापूस, तूर, हळद आणि इतर उभे असलेले पिके पाण्याखाली बुडाल्याचे शेतकऱ्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

हे नुकसान तहसीलदार श्री. राजेश सरोदे यांच्या समक्ष १५ सप्टेंबर रोजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायती सदस्य आणि मोठ्या संख्येने शेतकऱ्यांच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले.

मानधानी शेत शिवारातील काही शेतकऱ्यांच्या शेतात घुगे, तालुका कृषी अधिकारी जिंतूर आणि ऋषिकेश भंवर, कृषी सहाय्यक मानधानी यांनी तातडीने पोहोचून प्राथमिक पाहणी केली. त्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पिकांचे पंचनामे करण्याचे आश्वासन दिले आहे.स्थानिक शेतकरी बांधवांनी प्रशासनाकडे तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश देण्याची आणि नुकसान भरपाईसाठी कार्यवाही करण्याची जबरदस्त मागणी केली आहे. तसेच, पावसामुळे मानधानी परिसरात वन्य प्राण्यांचा संचार वाढल्याने काही शेतकऱ्यांना जखमही झाल्या असून, वन्य जीवप्राण्यांचा तात्काळ बंदोबस्त करण्याचेही आवाहन करण्यात येत आहे.

शेतकरी बांधवांचे म्हणणे आहे की, यामुळे त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर मोठा परिणाम होणार असून शासनाने लवकरात लवकर पंचनामे करून योग्य तो भरपाई निर्णय करावा.

# गोड रानमेवा(सीताफळे ) धारूर बाजारात दाखल. ग्रामीण भागातील नागरिकांना मिळतोय रोजगार

## संशोधन केंद्र धारूर येथे उभारण्याची गरज

किल्ले धारूर (प्रतिनिधी)

धारूर तालुक्यातील डोंगराळ भागातील रानमेवा (सीताफळ)धारूर बाजारात दाखल झाला आहे. गोड रानमेवा नागरिकांना मिळणार आहे यातून ग्रामीण भागातील डोंगराळ भागातील शेतकरी मजूर यांना रोजगार मिळणार आहे.

धारूर तालुका हा डोंगराळ तालुका समजला जातो या तालुक्यांमध्ये रानमेवा सीताफळाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होते यातून ग्रामीण भागातील डोंगरी भागात राहणारे नागरिक हा रानमेवा सीताफळ विक्रीसाठी धारूर बाजारामध्ये येतात यातून त्यांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होतो साधारणतः तीन महिने हा व्यवसाय सुरू असतो मोठ्या प्रमाणावर आवक



असते यामुळे धारूर मधीलही सिताफळे संपूर्ण महाराष्ट्र, भारत देशामध्ये जातात विविध व्यापारी धारूर तालुक्यामध्ये येऊन मोठ्या प्रमाणावर सीताफळे विक्रीसाठी मोठमोठ्या शहरांमध्ये घेऊन जातात यातून या भागातील शेतकरी नागरिक मजूर यांना रोजगार उपलब्ध होतो.

धारूर परिसरातील घागरवाडा ,सोनीमोहा, कोल्हेवाडी ,तरनळी, तेलगाव, चोरंबा आरणवाडी, अशा विविध भागातून मोठ्या प्रमाणावर सीताफळाची आवक शहरांमध्ये होते.

टोपले आणल्याबरोबर सकाळीच ही सीताफळे विकली जातात यातून दिवसाकाठी ८०० ते १००० रुपये रोजगार उपलब्ध होतो. ग्रामीण भागातील मोठ्या प्रमाणावर मजूर शेतकरी येथे सकाळीच विक्रीसाठी रानमेवा घेऊन येतात.

धारूर तालुक्याचे सीताफळे जातात संपूर्ण राज्यात - तालुक्यात मोठ्या प्रमाणावर सिताफळे (रानमेवा ) हा रानमेवा राज्याच्या कानाकोपऱ्यात पाठवला जातो डोंगराळ भाग असल्याने येथील सीताफळांना गोडी चांगली असते यामुळे येथील सीताफळी रानमेवा यांना मोठ्या प्रमाणात मागणी आहे.

तालुक्यात सिताफळ संशोधन केंद्राची गरज - धारूर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर सीताफळ येतात. येथील सीताफळांना गोडी देखील चांगली आहे परंतु सिताफळ संशोधन केंद्र धारूर तालुक्यामध्ये नसल्याने याची खंत येथील सीताफळ उत्पादकांना आहे. सीताफळे संशोधन केंद्र धारूर तालुक्यामध्ये करण्याची मागणी मोठ्या प्रमाणामध्ये होऊ लागली आहे, जेणेकरून येथील सीताफळ फळांवर वेगवेगळी प्रक्रिया करून ही शिताफळे राज्यातच नव्हे देशात पाठवता येतील.

## जिल्हा मिसींग सेल, बीड.

**शोधपत्रिका**

पो.स्टे. पिंपळनेर जिल्हा बीड गुन्हा रजी.नं. १३१/२०२५ कलम १३७(२) बी.एन.एस. प्रमाणे यातील बालक नामे ओमकार सुधाकर कांबळे वय-१४ वर्षे, ०१ महीना यास दिनांक २४/०५/२०२५ रोजी कोणीतरी अज्ञात व्यक्तीने पळवून नेले बाबत गुन्हा दाखल आहे.



नमुद गुन्ह्यातील पळवून नेलेल्या बालकाचे वर्णन खालील प्रमाणे

१) रंग- काळा सावळा २) उंची- १५५ सें. मि. ३) बांधा- सडपातळ ४) अंगावरील कपडे- चौखडा रंगाचे काळे शर्ट, व काळी जीन्स पॅन्ट व पायात चप्पल नाही.

मिळून किंवा दिसुन आल्यास संपर्क

गणेश धोक्रट सपोनि प्रभारी अधिकारी मिसींग सेल, बीड. मो.नं. 9552521680,

मधुसूदन घुगे सपोनि प्रभारी अधीकारी पो.स्टे. पिंपळनेर मो.नं. 9403031889, 9225092814



माजलगाव :- शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या.माजलगावचे वतिने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्काराचे आयोजन दि.१४ सप्टेंबर २०२५रविवार रोजी सकाळी ११वा.येथील जि.प.कन्या प्रशालेत करण्यात आले होते.
यावेळी कु.धनश्री रविंद्र राऊत चा सत्कार करताना माजी जि. प.समाजकल्याण सभापती अनुसया सोळुंके यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.
यावेळी पतसंस्थेचे चेअरमन रमेश फपाळ,आरबेसर,काळे सर व इतर शिक्षक व विदयार्थी व पालक वर्ग मोठ्याप्रमाणात हजर होते.

## दिव्यांगासाठी मोफत संगणकीय व व्यावसायिक प्रशिक्षणाचे आयोजन

बीड /प्रतिनिधी

जिल्हा परिषद, पुणे व सांगली अंतर्गत कार्यरत शासकीय प्रौढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृहात सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी मोफत प्रवेश देण्यात येणार आहेत. गरजू दिव्यांगानी या सुवर्ण संधीचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रशिक्षण केंद्रात सर्टिफिकेट इन कॉम्प्युटर ऑपरेशन वुईथ एम.एस. ऑफिस (संगणक कोर्स) यासाठी शैक्षणिक पात्रता किमान इ. ८ वी पास असावी. मोटार ॲन्ड आर्मेचर वायडींग, सबमर्सिबल पंप सिंगल फेज, (इलेक्ट्रीक कोर्स) यासाठी शैक्षणिक पात्रता किमान इ. ९ वी पास असावी. उमेदवाराचे वय १६ ते ४० वर्षे असावे. प्रशिक्षण कालावधी हा एक वर्षाचा असणार आहे.

प्रशिक्षण कालावधीत राहण्याची, जेवणाची व प्रशिक्षणाची मोफत सोय करण्यात आली असून अद्यावत व परीपूर्ण संगणक कार्यशाळा, भरपूर प्रॅक्टीकल्स व व्यवसायाभिमुख मोफत प्रशिक्षण, नेटवकींग व इंटरनेटची सुविधा,अनुभवी व तज्ञ निदेशक, उज्वल यशाची परंपरा, समाज कल्याण विभागाकडून स्वयंरोजगारासाठी व्यवसायासाठी बीज भांडवल आदी सोयी सुविधा देण्यात येणार आहेत.

उमेदवारांनी त्यांचे प्रवेश अर्ज अधिक्षक, शासकीय प्रौढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह, टाकळी रोड, म्हेत्रे मळा, गोदड मळ्या जवळ, मिरज ता. मिरज जि. सांगली येथे प्रत्यक्ष अथवा टपालाद्वारे पाठवावेत. अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, दहावी मार्कशिट व प्रमाणपत्र,अपंगत्व असल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र, आधार कार्ड, युडीआयडी कार्ड, डोमिसाईल प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला छायांकित प्रतिसह सादर करावा. प्रवेश अर्ज प्राप्त झाल्यानंतर तज्ञ समिती व्दारे मुलाखती घेऊन प्रवेश देण्यात येईल.

अधिक माहितीसाठी ०२३३-२२२२९०८ मोबाईल ९९२२५७७५६१, ९५९५६६७९३६, ९३२५५५५९८१ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## बीड जिल्ह्यात मुसळधार पावसाचा हाहाकार, शेतीचे प्रचंड नुकसान – बाजीराव ढाकणे

बीड/ प्रतिनिधी

मागील तीन दिवसांपासून बीड जिल्ह्यात मुसळधार पावसाने थैमान घातले असून, विशेषतः केज तालुका आणि आसपासच्या भागात शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पावसामुळे उभ्या पिकांवर पाणी साचल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, शेतकरी अडचणीत आले आहेत.

या पार्श्वभूमीवर महाएनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्यचे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे यांनी राज्य सरकारकडे शेतकऱ्यांना तातडीने हेक्टर १ लक्ष रुपये आर्थिक मदत जाहीर करण्याची जोरदार मागणी केली आहे.सरकारने या संकटाची गांभीर्याने दखल घेऊन, जिल्हा



प्रशासनामार्फत युद्धपातळीवर मदतकार्य सुरू करावे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना फक्त आधार नव्हे, तर थेट मदतीची गरज आहे.या भागात अजूनही हवामान ढगाळ असून पुढील काही दिवस पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. प्रशासनाने मदतकार्याची गती वाढवावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## ५० टक्के व्याज माफ सवलत योजनेचा लाभ घ्या – बी एस भोसले

बीड /प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या थकीत कर्ज प्रकरणात संपुर्ण थकीत कर्ज रक्कमेचा एकरक्कमी भरणा करण्याऱ्या लाभार्थ्यास थकीत व्याज रक्कमेत ५० टक्के सवलत देण्यातबाबतची एकरकमी परतावा योजना दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत राबविण्यात येत आहे. महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थींनी सदर योजनेचा फायदा घेऊन कर्जमुक्त व्हावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक श्री.बी.एस. भोसले, यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी महामंडळाच्या बीड जिल्हा कार्यालयाशी ०२४२-२३२६२४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# ५४ मेंढ्या' ३ बैलासह संसार उपयोगी साहित्य गोदावरी पात्रात वाहुन गेले.....!

## पैठण तालुक्यातील पंथेवाडी येथील घटना शनिवारी मध्यरात्री दीड तास अतिवृष्टीने अचानक पूर...!

पैठण/प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील शनिवारी मध्यरात्री दीडच्या सुमारास आलेल्या अतिवृष्टी मुसळधार पावसामुळे काहींचे जनजीवन विस्कळित झाले मध्यरात्री अतिवृष्टी पावसामुळे झालेल्या पैठण तालुक्यातील पंथेवाडी येथील दोन मेंढपाळाच्या ५४ शेळ्या मेंढ्या व एक बैल दोन गोहरे घरातील भांडी बासणे संसाराचे साहित्य वड्याला पूर आल्याने गोदावरी नदीत वाहून गेले यामुळे मेंढपाळांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे पैठण तालुक्यातील रहाटगाव येथील मेंढपाळ मल्हारी डोईफोडे व अंबादास खोलासे हे मेंढपाळ मेंढ्या चारण्यासाठी पंथेवाडी शिवारात राहोटी टाकून राहत होते शनिवारी मध्यरात्री पंथेवाडी परिसरात मुसळधार पाऊस झाल्यामुळे दीडच्या सुमारास राहत असलेल्या जवळच्या ओढ्याला मोठा पूर आला काही करण्याच्या आत या पुरात दोन्ही



मेंढपाळाच्या ५४ मेंढ्या ३३ कोकरे गोकुळ शेळ्या ९ अशा ५४ शेळ्या मेंढ्यासह एक बैल दोन गोहरे तसेच सर्व भांडी संसार उपयोगी साहित्य व तीन मोबाईल वाहून वाड्यातून गोदावरी नदी पात्रात गेले सर्व संसाराचं वाहून गेल्याने ही दोन्ही कुटुंबे उघड्यावर आली आहेत रविवारी या घटनेचा पंचनामा पैठणच्या तलाठी शितल झिरपे यांनी केला मेंढपाळाबाबत मनाला हेलावून टाकणारी घटना घडली असून शेळ्या मेंढ्या सह जनावरे वाहून गेल्याचा पंचनामा करण्यात आला .

८ मंडळ पैठण तालुक्यातील मंडळात अतिवृष्टी नोंद घेण्यात आली तर दावरवाडी हर्षी शिवार ज्ञानेश्वरवाडी वरुडी पिंपळवाडी लोहगाव गावात ढगफुटी सदृश्य पाऊस झाला

# रामचंद्र पाटील बाळापूरकर यांनी रुग्ण कल्याण समिती सदस्याचा पदभार स्वीकारला

## स्थानिक आरोग्य सेवेत सुधारणा घडवून आणण्याचा निर्धार

धर्माबाद / अशोक पडोळे

बाळापूर शहरातील प्रगल्भ सामाजिक कार्यकर्ते, तीस वर्षे मेडिकलच्या माध्यमातून नागरिकांना सेवा देत असलेले, माननीय आमदार राजेश पवार यांचे अत्यंत विश्वासू रामचंद्र पाटील बाळापूरकर यांनी आज सोमवारी दवाखान्यात रुग्ण कल्याण समिती सदस्य या जबाबदारीचा पदभार स्वीकारला. या प्रसंगी आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी, शहरातील प्रतिष्ठित नागरिक तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार राजेश पवार यांच्या शिफारशीनुसार श्री रामचंद्र पाटील बाळापुर यांची धर्माबाद ग्रामीण रुग्णालयात रुग्ण कल्याण समितीवर सदस्य पदी नियुक्ती झाली. त्यांनी ग्रामीण रुग्णालयाचे कार्यालयीन अधीक्षक डॉ. वेनुगोपाल पंडित व इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या समवेत संपूर्ण रुग्णालयाची पाहणी



केली. त्यामध्ये हिरकणी कक्ष, प्रस्तुतिगृह, शस्त्रक्रिया गृह, सामान्य वार्ड, पिण्याचे पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृह, इतर सर्व बाबींची पाहणी केली तसेच रुग्णांशी संवाद साधला.डॉक्टर पंडित यांनी रुग्णालयात नवीनच सुरू होणारे डायलिसिस विभाग व अत्याधुनिक सामग्री याची माहिती दिली.यानंतर कार्यालयीन अध्यक्ष डॉक्टर पंडित यांनी सत्कार समारंभाचा कार्यक्रम आयोजन करून श्री रामचंद्र पाटील यांनी पदभार स्वीकारल्याबद्दल रुग्णालयातर्फे सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी डॉक्टर कांबळे सर, डॉ. म्याकलवार सर डॉ. श्याम लखमावार, माजी नगरसेवक श्री रमेश पाटील, श्री नरेंद्र रेड्डी, श्री अंकुश भोसले, श्री (बापू) नरसारेड्डी, श्री दाऊद बेग, श्री संतोष विभुते, पत्रकार संजय कदम पत्रकार भगवान कांबळे आणि रुग्णालयातील इतर अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.श्रीरामचंद्र पाटील यांच्या नियुक्तीमुळे धर्माबाद तालुक्यातील आरोग्य व्यवस्थेत नवा उत्साह संचारला असून, नागरिकांमध्येही नवी अपेक्षा निर्माण झाली आहे.

### जनतेसाठी आरोग्य सुविधा सक्षम करणे हेच माझ्या केंद्रबिंदू असेल - पाटील

पदभार स्वीकारल्यानंतर बोलताना पाटील म्हणाले, रुग्णांना दर्जेदार व वेळेवर उपचार मिळणे, औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवणे, दवाखान्यात स्वच्छता व सुव्यवस्था राखणे तसेच जनतेसाठी आरोग्य सुविधा सक्षम करणे हेच माझ्या केंद्रबिंदू असेल. या समितीतून मिळणाऱ्या जबाबदारीचे मी प्रामाणिकपणे पालन करणार आहे.



# घनसावंगी तालुक्यातील नरसिंह मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेच्या पाझर तलावाला भगदाड; मोठ्या आर्थिक नुकसानीची शक्यता

घनसावंगी (प्रतिनिधी) - घनसावंगी तालुक्यातील शिवारात असलेल्या नरसिंह मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेच्या ताब्यातील पाझर तलावाला अचानक भगदाड पडल्याने तलावातील पाणी झपाट्याने बाहेर गेलं असून संस्थेच्या मत्स्य व्यवसायास मोठा आर्थिक फटका बसल्याची माहिती समोर आली आहे.या तलावात मोठ्या प्रमाणात मासे सोडण्यात आले होते, मात्र पाण्याची गळती झाल्याने मासे वाहून गेले असून शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. स्थानिक मत्स्य व्यावसायिकांनी याबाबत प्रशासनाकडे तातडीने पंचनामा करून आर्थिक मदतीची मागणी केली आहे.सध्या तलाव परिसरात पाहणी सुरू असून, पाझर तलाव का फुटला याचा तपास सुरू आहे. प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# कारेगाव फाटा येथे शेतकरी नेते बच्चू कडु यांची विराट सभा संपन्न

## मोठ्या संख्येने शेतकरी बांधवांची उपस्थिती

धर्माबाद /अशोक पडोळे

धर्माबाद तालुक्यातील कारेगाव फाटा येथे शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने आयोजित मेळावा दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी बोलताना माजी मंत्री बच्चुभाऊ कडू यांनी सरकारवर जोरदार शब्दात टीका केली तसेच जो पर्यंत शेतकऱ्यांची एकजूट होणार नाही. तो पर्यंत सरकार आपल्या प्रश्नांकडे ध्यान देणार नाही.त्यामुळे आपण सर्वांनी एकजुटीने लढा द्या मी आपल्या सोबत आहे. सरकार आपली दखल कशी घेणार नाही ते बघू असे ते म्हणाले. फक्त तुम्ही एकजूट व्हा व माझ्या सोबत राहा मला कुठलाही राजकीय किंवा व्यक्तिगत स्वार्थ नाही

या राज्यातील शेतकरी सुखी झाला पाहिजे असेही ते म्हणाले ही लढाई जातीपातीच्या पलीकडची असून आमची सरकारने लूट



थांबविली पाहिजे. शेतकऱ्यांची कर्जमाफी केली पाहिजे अन्यथा आम्ही हक्काने लढून घेऊ.केंद्र सरकारने अमेरिकेचा १७ हजार रुपये प्रति क्विंटल प्रमाणे कापूस खरेदी केला असून आपला कापूस सात ते आठ हजाराच्या वर जात नाही असे यावेळी न विसरता शेतकऱ्यांना ठणकावून सांगितले. सोयाबीन तीन ते चार हजारच्या वर जाणार नसून सोयाबीन खरेदी केंद्र लवकरात लवकर सुरू करण्यासाठी शेतकऱ्यांनी एकजूट होऊन सरकारला भाग पाडा असा प्रखर सल्ला यावेळी दिला. शेतकऱ्यांनी एकजूट होऊन पंजाब प्रमाणे आपल्याही शेतमालाला ९०% हमीभाव मिळाला पाहिजे या यासाठी रस्त्यावर उतरण्याची तयारी ठेवा. तरच हे सरकार तुमच्या शेतमाला भाव देईल आता शेतकऱ्यांनी जागे झाले पाहिजे व सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरण्याची तयारी ठेवून एकजूट तयार करा तरच सरकार तुम्हाला तुमच्या शेतीमालाला हमीभाव देईल यासाठी मी तुमच्यासोबत प्रत्यक्ष सहभागी होणार असून आजपर्यंत माझ्यावर शेकडो केसेस झाले आहेत मी शेतकऱ्यांचा पुत्र असून एखाद्या धरणामध्ये किंवा प्रकल्पात जमीन घ्यायची असेल तर भूसंपादन व पुनर्वसन कायदा २०१३ नुसार शेतकऱ्यांची सहमती असल्याशिवाय शेतकऱ्यांची शेतजमीन घेता येत नाही. असेही ते म्हणाले. नागपूर येथील बोरीबुट्टी येथे दिनांक २८ ला सर्वांनी यावे कारण येथे मोर्चात सहभागी होऊन सरकारला पंजाब येथील शेतकऱ्या प्रमाणे आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी भाग पाडू असेही शेवटी बच्चू कडू यांनी आव्हान केले. यावेळी तालुक्यासह , परिसरातील शेतकरी, शेतमजूर हजारोच्या संख्येने उपस्थित होते.धर्माबाद, नायगांव, उमरी तालुक्यातील हजारो हेक्टर क्षेत्रातील शेतीची दरवर्षी पाण्यात पूर्ण पिके बुडून जातात यावर सक्षम उपाय होणे गरजेचे आहे. मागील एक आठवड्यापासून आपण इथे साखळी उपोषण सुरू केले यातून आपली व्यथा स्पष्ट दिसते अशीच एकी कायम राहू द्या आपण एक होऊन लढल्या शिवाय सरकार दखल घेणार नाही हे तितकेच खरे आहे .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोशनगावचे सरपंच प्रतिनिधी शिवराज पाटील भंडगे यांनी केले.धर्माबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश कराड, सहाय्यक पोलीस निरीक्षक पगलवाड मॅडम, पोलीस उपनिरीक्षक लोणेकर, उपनिरीक्षक पवार मॅडम,पोलीस स्टेशनचे वतिने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

सुत्रसंचलन शिवराज पाटील भंडगे यांनी बोलताना असेही ते म्हणाले

हा मेळावा यशस्वी करण्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी आणि कारेगाव गावकरी मंडळी तसेच चार तालुक्यातील शेतकरी तथा शेतकरी संघर्ष समिती ने परिश्रम घेतले.



# बांधकाम कामगारनी महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनाच्या माध्यमातून सर्व योजनेचा लाभ घ्यावा - रणवीर अमरसिंह पंडित

बीड /प्रतिनिधी

महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेच्या माध्यमातून मादळमोही ता गेवराई येथे दिनांक १६/०९/२०२५ मंगळवार रोजी मादळमोही ग्रामपंचायत येथे नोंदीत कामगार यांच्या साठी मोफत आरोग्य शिबिराचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते रणवीर काका पंडित यांच्या हस्ते तर शिबिराचे अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कामगार आघाडी प्रदेश उपध्यक्ष नगरसेवक अमर शेख हे होते.

यावेळी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शेख नासिर (बीड जिल्हा अध्यक्ष) ,मादळमोहीचे सरपंच राजेंद्र काका वारंगे, उपसरपंच अबुबकर शेख, चेअरमन हनुमान गोडसे ग्रामपंचायत सदस्य अरुण जिजा वाघमारे , ग्रामपंचायत सदस्य अमर जगताप ,ग्रामपंचायत तथा गोसावी समाज तालुकाध्यक्ष गेवराई सोमनाथ पुरी ,शाहीन बाभी पठाण ग्रामपंचायत सदस्य ,हरी नाना भोपळे ,माऊली तळेकर ,सुनील शाहरुख पठाण ,इंजिनिअर अतिक पठाण ,मसूद पठाण दिनानाथ काशीद ,आयुब पठाण ,नसीर भाई पठाण ,नासिर पटेल मदलमोही येथील ग्रामस्त व कार्यक्रमाचे आयोजक जील्हा उपध्यक्ष सय्यद अमेर व सहकारी उपस्थित होते.

महाप्रबंधक
मध्य रेल
अमलनेर (भां) - बीड नई रेल लाइन का
उद्घाटन
एवं
बीड से अहिल्यानगर ट्रेन को हरी झंडी दिखाकर
शुभारंभ
के अवसर पर आपको सादर आमंत्रित करते हैं।
द्वारा
श्री देवेंद्र फडणवीस
माननीय मुख्यमंत्री, महाराष्ट्र
श्री अजित पवार
माननीय उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र
तथा पालकमंत्री, बीड
गरिमामयी उपस्थिति
प्रा. राम शिंदे
माननीय सभापति, महाराष्ट्र विधान परिषद
श्री राधाकृष्ण विखे पाटील
माननीय जल संसाधन मंत्री (गोदावरी और कृष्णा बेसिन विकास निगम), महाराष्ट्र
श्रीमती पंकजा मुंडे
माननीया पर्यावरण एवं जलवायु परिवर्तन, पशुपालन मंत्री, महाराष्ट्र
श्रीमती रजनी पाटील
माननीया सांसद (राज्यसभा)
श्री बजरंग सोनवणे
माननीय सांसद (लोकसभा)
स्थान: बीड रेलवे स्टेशन
दिनांक: 17 सितम्बर 2025
समय: दोपहर 1:00 बजे
उत्तरापेक्षी: मंडल रेल प्रबंधक, पुणे मंडल, मध्य रेल. फोन: 020-26105000
अतिथियों से अनुरोध है कि कृपया 20 मिनट पहले अपना स्थान ग्रहण कर लें।

सस्नेह निमंत्रण
बीड जिल्हा पत्रकार संघ (महाराष्ट्र)
शिक्षण क्षेत्रात योगदान देणाऱ्या मान्यवरांचा
सन्मान सोहळा-२०२५
दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ३.०० वा. संपन्न होत आहे.
तरी आपण या कार्यक्रमास आवर्जुन उपस्थित रहावे ही विनंती.
शुभहस्ते
मा.ना.पंकजाताई मुंडे
(पर्यावरण, वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री महाराष्ट्र राज्य)
विशेष अतिथी
मा.श्री.विवेक जॉन्सन
(जिल्हाधिकारी, बीड)
मा.श्री.जितीन रहमान
(मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बीड)
कार्यक्रमाचे अध्यक्ष
मा.श्री.वसंत मुंडे
(प्रदेशाध्यक्ष)
महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ
प्रमुख पाहुणे
मा.श्री.संतोष मानूरकर
(अध्यक्ष)
बीड जिल्हा पत्रकार संघ
विनित
नितीन क्षीरसागर (अध्यक्ष : संयोजन समिती)
स्थळ
हॉटेल ग्रॅन्ड यशोदा, बार्शी रोड, बीड.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

## मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन

# लढ्याचा इतिहास काय आहे ?



मराठवाडा मुक्ती संग्राम म्हणजे हैदराबाद संस्थानातील मराठवाडा प्रदेश १९४८ मध्ये स्वतंत्र होऊन भारतामध्ये विलीन होण्यासाठी लढलेला लढा होय. हा लढा हैदराबादचा नवाब (निझाम) आणि त्याच्या शासनाविरुद्ध होता, ज्यात अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी आपले प्राण गमावले. शेवटी, भारतीय सैन्याने 'ऑपरेशन पोलो' नावाची लष्करी कारवाई करून १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाचा पराभव केला आणि मराठवाडा भारताचा भाग बनला, म्हणून दरवर्षी १७ सप्टेंबर हा 'मराठवाडा मुक्ती दिन' म्हणून साजरा केला जातो.

लढ्याची पार्श्वभूमी

हैदराबाद संस्थानाचा भाग: भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, बहुतांश संस्थाने भारतात विलीन झाली, पण हैदराबाद संस्थानाचे नवाब मात्र भारतात सामील होण्यास तयार नव्हते. मराठवाडा हा हैदराबाद संस्थानाचाच एक भाग होता.

निजामाची जुलमी राजवट: निजामाच्या शासनाखाली मराठवाड्यातील जनतेला नागरी आणि राजकीय हक्क नव्हते. तिरंगा फडकवणे हा गुन्हा मानला जात असे.

लढ्याची सुरुवात: हैदराबाद संस्थानातील जनतेने स्वातंत्र्यासाठी संघर्ष सुरू केला, ज्याला 'हैदराबाद मुक्ती संग्राम' म्हणून ओळखले जाते.

लढ्यातील प्रमुख घटना

स्वामी रामानंद तीर्थ यांचे नेतृत्व: स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली 'महाराष्ट्र परिषदे'ची स्थापना करण्यात आली आणि जनतेने हैद्राबाद संस्थानाच्या निजामाविरुद्ध लढा दिला.

जनतेचा सहभाग: या लढ्यात अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी आपले प्राण गमावले. स्त्रियांचाही या लढ्यात मोठा सहभाग होता, ज्यात दगडाबाई शेळके, गोदावरीबाई टेके, सोनाबाई पाटील यांसारख्या अनेक महिलांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

लष्करी कारवाई: अखेरीस, १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारने 'ऑपरेशन पोलो' या लष्करी कारवाईद्वारे निजामाचा पराभव केला.

मराठवाड्याचे भारतात विलीनीकरण: १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थाने भारतीय संघराज्यात विलीन झाली आणि मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळाले.

मराठवाडा मुक्ती संग्रामाचे महत्त्व

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची पूर्तता: मराठवाडा मुक्तीसंग्राम हा भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचाच एक भाग होता, ज्याने भारतीय स्वातंत्र्याची ही अपूर्ण राहिलेली प्रक्रिया पूर्ण केली.

१७ सप्टेंबरला मुक्ती दिन: हा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी १७ सप्टेंबरला साजरा केला जातो, ज्यात या लढ्यातील हुतात्म्यांना आदरांजली

लेखन - शंकर झाडे वडवणी तालुका प्रतिनिधी

## वडवणी तालुक्यातील बाहेगव्हाण येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारला



वडवणी/प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील बाहेगव्हाण येथे शिवप्रेमींच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा अवघ्या एका रात्रीत हा पुतळा उभारण्यात आला असून तालुक्यात बाहेर गव्हांकरांना सकाळी रयतेचे राजे शिवछत्रपती यांच्या पुतळ्याचे मंगळवार दि १६ रोजी सकाळी दर्शन झाल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे ,येथील शिवप्रेमींनी, सामाजिक संघटनांनी व तरुणांनी मिळून हा उपक्रम राबवाला ,छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मृती जपण्याचा आणि पुढील पिढींला त्यांचा आदर्श व परक्रमाची प्रेरणा देण्याचे हेतूने पुतळा उभारण्यात आला, पुतळ्याचे पूजन, आरती व जयघोष व फटाक्यांची आतिषबाजी व तोफांची सलामी देत शिवरायांचे जंगी स्वागत करण्यात आले, यावेळी परिसरातील नागरिक, विद्यार्थी, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते, भविष्यात पुतळा परिसराचे शुशोभिकरण व विद्युत रोषणाई करण्याचा संकल्प युवकांनी केला असून पुतळा उभारण्याची माहिती मिळताच आज सकाळी लहान थोर मंडळींनी पुतळा येथे जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर नतमस्तक होऊन अभिवादन करण्यासाठी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभा करण्यासाठी गावातील युवकाची टीम यांनी आतंक परिश्रम घेऊन हा पुतळा उभा करण्यात आला त्यामुळे गावातील नागरिकाकडून या युवक टीमचे कौतुक होत आहे.

# अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना तात्काळ मदत करा; किसान सभा



परळी / प्रतिनिधी

अखिल भारतीय किसान सभा परळी तालुक्याच्या वतीने मंगळवार दि १६ रोजी परळी तहसील कार्यालय येथे निदर्शने करत तालुक्यातील अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांना तात्काळ मदत करण्याची मागणी करण्यात आली.परळी तालुक्यात दि १५ रोजी मध्यरात्रीपासून पश्चिम भागात ढगफुटी सदृश्य अतिवृष्टी होऊन प्रचंड पूर परिस्थिती निर्माण झाली. या पुरामुळे काही ठिकाणी बंधारे फुटली. नदीचे तट तुटून नदीचे पाणी दोन्ही बाजूला पसरून मोठ्या प्रमाणात पिकासह शेतीचे नुकसान झाले. बऱ्याच ठिकाणी नदीने पात्र सोडून ती शेतातून प्रवाहित झाली. व पुढची पाच दहा वर्ष प्रयत्न करूनही दुरुस्त होणार नाही अशी शेताची अवस्था करून गेली. ठिकठिकाणी विद्युत खांब कोसळले, जनावरे वाहून जाऊन जानमालाचे नुकसान झाले. पिकासह जमिनी खरडून गेल्या. बैलगाडी, ठिबक, स्प्रिंकलर अशी व इतरही शेती अवजारे व जनावरांच्या चाऱ्यांच्या गंजी वाहून गेल्या. बांधांचे तटबंध तुटले. विहिरी खचल्या. अन् त्याहीपेक्षाही जास्तीचा खचला तो शेतकरी. अशा खचलेल्या शेतकऱ्यांना शासनाने तातडीचा दिलासा द्यावा. पीक नुकसानीची हेक्टरी पन्नास हजार रुपये भरपाई देऊन जमिनीच्या दीर्घकाळ झालेल्या नुकसानीचे विविध पैलू लक्षात घेऊन त्याची स्वतंत्र वेगळी मदत संबंधित शेतकऱ्यांना करावी. जनावरे व शेती उपयोगी उपकरणे यांचे झालेले नुकसान त्वरित शेतकऱ्यांच्या खात्यावर रोख स्वरूपात जमा करून दिलासा द्यावा. पावसामुळे खचलेली घरे, वाहून गेलेली घरे यांनाही तातडीने मदत करावी. गावांचा तुटलेला संपर्क पूर्ववत करण्यासाठी खचलेले रस्ते, पूल यांच्या दुरुस्तीचे कमी तातडीने हाती घ्यावीत. विद्युत खांब पडल्याने विस्कळीत झालेला विद्युत पुरवठा प्रथमतः प्राधान्याने पूर्ववत करून लोकांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडवावा अशी मागणी अखिल भारतीय किसान सभा परळी तालुक्याच्या वतीने करण्यात आली.

परळी तहसील कार्यालय येथे करण्यात आलेल्या निदर्शने प्रसंगी किसान सभेचे जिल्हा अध्यक्ष कॉ.एड.अजय बुरांडे,माकप तालुका सचिव कॉ. गंगाधर पोटभरे,कॉ.भगवान बडे, कॉ.पांडुरंग राठोड, कॉ.बालासाहेब कडभाने, कॉ. विशाल देशमुख, विष्णु देशमुख, ब्रम्हानंद देशमुख आदीसह अनेक पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

नुकसानग्रस्त भागाची केली पाहणी

किसान सभा बीडचे जिल्हाध्यक्ष, शेतकरी नेते कॉ.अजय बुरांडे यांच्यासह किसान सभेच्या कार्यकर्त्यांनी अतिवृष्टीने नुकसान झालेल्या परळी तालुक्यातील पौळ पिंप्री, कासारवाडी आदीसह अनेक गावातील शेतांची प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी केली.शेतकऱ्यांशी चर्चा करून त्यांना धीर देऊन, झालेल्या नुकसानाची भरपाई मिळवण्यासाठी व सततच्या शेती अरिष्टां मधून शाश्वत मार्ग काढण्यासाठी लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त केला.



## रोटरीचा राष्ट्रशिल्पकार पुरस्कार संदिप गाडेकर यांना प्रदान !

मानूर /प्रतिनिधी ह्व

शिरूर कासार येथील रहिवाशी तथा माटेगांव ता.गेवराई येथे शिक्षक म्हणून कार्यरत असलेले संदिप भगवान गाडेकर यांना रोटरीचा राष्ट्रशिल्पकार पुरस्कार अजय बहिर यांचे हस्ते प्रदान करण्यात आला ,रोटरीचा आदर्श शिक्षक पुरस्कार यापुर्वी शिरूरचे भालचंद्र गाडेकर यांना देण्यात आला होता .रोटरीचे अध्यक्ष भागवत ढाकणे सचिव प्रविण पटेल ,चेअरमन गणेश मैड, सचिन लातुरकर ,प्रदिप शेटे यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रतिवर्षी शिक्षक दिनानिमित्त रोटरी क्लब बीड हा पुरस्कार वितरण करत असते यावेळी पांच शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.संदिप गाडेकर यांचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे .

# माजलगाव बाजार समिती कै.वसंतरावदादा पाटील स्मृती पुरस्काराने सन्मानित

- उपसभापती श्रीहरी मोरे यांनी स्विकारला पुरस्कार




माजलगाव /प्रतिनिधी

येथील कृषि उत्पन्न बाजार समितीला उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या वतीने संघाचे संस्थापक वसंतरावदादा पाटील स्मृती पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले असुन उपसभापती श्रीहरी दिगंबरराव मोरे यांनी पुणे येथे दि. १६ सप्टेंबर २०२५ रोजी संघाच्या सर्वसाधारण सभेत हा पुरस्कार स्विकारला.


महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या वतीने उत्कृष्ट कार्य करणा-या बाजार समित्यांना हा पुरस्कार देउन सन्मानित केले जाते. माजलगाव कृषि उत्पन्न बाजार समितीने वार्षीक सभा घेणे, नियमीत वेळेवर लेखापरिक्षण करणे, दोष दुरूस्ती अहवाल, शेतक-यांसाठी नाममात्र दरात भोजन व्यवस्था, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा, पार्कींग व्यवस्था अशा विवीध शेतकरी हिताच्या योजना राबवत उत्कृष्ट असे कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या वतीने संघाचे संस्थापक वसंतरावदादा पाटील स्मृती पुरस्कार २०२५ ने माजलगाव कृषि उत्पन्न बाजार समितीला सन्मानित करण्यात आले असुन उपसभापती श्रीहरी दिगंबरराव मोरे यांनी पुणे येथे हा पुरस्कार स्विकारला यावेळी संचालक आसाराम घायतिडक, भगवान आगे, आबाजी भोसले, संजय कचरे, सचिव एच. एन. सवणे, लेखापाल उध्दव फपाळ, नितीन पौळ, सुमित पौळ, गणपतराव कदम, दिनानाथ शेंडगे यांची उपस्थिती होती.

## नांदेवालीत परतीच्या पावसाने नदीला पूर; शेतकरी वर्गाचे लाखो रुपयांचे नुकसान

मानूर /प्रतिनिधी ह्व

शिरूर तालुक्यातील नांदेवाली परिसरात परतीच्या पावसामुळे सिंदफणा व किन्हा नद्यांना पूर आला. या पूरपाण्याने नदीपात्रालगतच्या शेतांमध्ये शिरकाव करून शेतजमिनीतील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले आहे. गेल्या आठ-दहा दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आधीच खरीप पिकांची अवस्था बिकट झाली होती. याचदरम्यान अचानक आलेल्या पुरामुळे शेतकरी वर्गावर दुहेरी संकट कोसळले आहे.

यंदा नांदेवाली परिसरात ऊस, तूर, कापूस, मका, भाजीपाला आदी खरीप पिके जोमाने उभी होती. अनेक शेतकऱ्यांनी लाखो रुपयांचा खर्च करून बियाणे, खत, औषधे यासाठी कर्ज काढले होते. मात्र नदीला आलेल्या पुराच्या पाण्याने उभी पिके वाहून गेली. काही ठिकाणी पिके पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने सडून जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले



यामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असून हंगामी खर्च कसा भागवायचा, मुलांच्या शिक्षणाची फी, घरखर्च तसेच बँकांचे कर्ज परतफेडीचा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकरी वर्ग निराश व हतबल झाला आहे.या परिस्थितीत प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी शेतकरीवर्गाकडून होत आहे. येत्या काही दिवसांत पावसाचे प्रमाण असेच राहिल्यास नुकसान आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.


## अंमळनेर गटात अतिवृष्टीचा फटका

### तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्या- भाऊसाहेब भवर यांची मागणी

पाटोदा (प्रतिनिधी) आष्टी मतदार संघात मुसळधार पावसाने हाहाकार माजवला असून पाटोदा तालुक्यातील अंमळनेर जिल्हा परिषद गटात अतिवृष्टीमुळे नद्या नाले विहिरी तुडुंब भरून वाहत आहेत. त्यामुळे अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. तसेच शेती पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. झालेल्या नुकसानीचे व पिकांचे पंचनामे करून अहवाल जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाला व विमा कंपन्यांना लवकरात लवकर सादर करावा अशी मागणी प्रशासनाला केली आहे. गेल्या दोन-तीन दिवसात महाराष्ट्रात अतिवृष्टीच्या पावसामुळे दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने अनेक गोरगरीब शेतकऱ्यांचे संसार उध्वस्त झाले आहेत. शेतकऱ्यांच्या घरासह पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे महसूल विभागाच्या आणि कृषी विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामे करावीत तसेच घरांचे स्थळ पंचनामे करून त्याचा अहवाल राज्य शासनाला पाठवा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब भवर यांनी केली आहे.



## सर्पदंशामुळे दहीफळ येथे मुलीचा मृत्यू



प्रतिनिधी । धारूर

सर्पदंशामुळे शाळकरी मुलीचा मृत्यू झाल्याची घटना पहाडी दहिफळ येथे मंगळवारी सकाळी घडली .ज्ञानेश्वरी हरिभाऊ नागरगोजे वय ८ वर्षे असे शाळकरी मुलीचे नाव असून इयत्ता पहिलीच्या वर्गात शिक्षण घेत होती .पहाडी दहिफळ गावालगत असलेल्या शेतातील घरात झोपेच्या अवस्थेत सोमवारी पहाटेच्या वेळी सर्पदंश झाला . प्राथमिक उपचार वडवणी येथे खाजगी रुग्णालयात करून बीड येथे नेण्यात येत असताना प्रवासादरम्यान तिचा मृत्यू झाला




## शिक्षक सह.पतसंस्थेचे वतीने कु.धनश्री राऊत चा सत्कार संपन्न

माजलगाव प्रतिनिधी शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या.माजलगावचे वतिने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्काराचे आयोजन दि.१४ सप्टेंबर २०२५रविवार रोजी सकाळी ११वा.येथील जि.प.कन्या प्रशालेत करण्यात आले होते.यावेळी कु.धनश्री रविंद्र राऊत हिने चइइड मध्ये स्वामी रामानंद तीर्थ शासकीय महाविद्यालय अंबाजोगाई येथे प्रवेश निश्चित झाला आहे. त्याबद्दल तिचा सत्कार करताना माजी जि. प.समाजकल्याण सभापती अनुसया सोळुंके यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पतसंस्थेचे चेअरमन रमेश फपाळ,आरबेसर,काळे सर व इतर शिक्षक व विदयार्थी व पालक वर्ग मोठ्याप्रमाणात हजर होते.

# सरकारी कामगार अधिकारी बीड यांच्या कडुन २६३ बांधकाम कामगारांची फसवणूक

## कामगारांची जिल्हाधिकारी यांच्याकडे धाव

अंबाजोगाई (प्रतिनिधी)-तालुक्यातील २६३ बांधकाम कामगार यांची कामगार अधिकारी बीड यांच्या कडुन फसवणूक झाली असून या संदर्भात नोंदणीकृत कामगारांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे धाव घेतली असून निवेदन दिले आहे

यावेळी देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की,या २६३ नोंदणीकृत बांधकाम कामगारां साठी तत्कालीन सरकारी कामगार अधिकारी बीड मुंडे यांनी दिनांक २५.०५.२०२५ रोजी रविवार पेठ, मक्का मजीद च्या समोर शादी खाना अंबाजोगाई या ठिकाणी किचन सेट संसार उपयोगी वस्तू च्या कॅम्प चे आयोजन करण्यात आले होते त्या कॅम्प मध्ये एकूण २६३ बांधकाम कामगार यांचे फोटो, बोटाचे ठसे घेण्यात आले व कामगार यांना कळविण्यात आले की दिनांक १०.०६.२०२५ रोजी तुम्हाला किचन सेट संसार उपयोगी वस्तू दिले जाईल परंतु तत्कालीन कामगार अधिकारी यांची नियत वयोमानानुसार दिनांक ३१.०५.२०२५ रोजी रिटायरमेंट झाली तसेच त्यांच्या जागी पदभार घेतलेले नवीन सरकारी कामगार अधिकारी श्री. सुधाकर कोणाले यांना समक्ष भेटून त्यांना पूर्ण माहिती देऊन बांधकाम कामगार यांना किचन सेट संसार उपयोगी वस्तू देण्याबाबत विनंती केली. व अध्याप पर्यंत जवळ जवळ ४ महिने झाले तरी आणखी मिळाले नाहीत

यामुळे कामगारांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे धाव घेतली आहे तरी आम्हा २६३ बांधकाम कामगार यांचे किचन सेट संसार उपयोगी वस्तू लवकरात लवकर देण्यात यावे

# रेल्वेसाठी जनतेचा सालगडी म्हणून पाठपुरावा केल्याचा आनंद: खा.सोनवणे

## बारा वर्षात ९९ तर बारा महिन्यात वडवणीपर्यंत रेल्वे मार्गाचे काम केल्याचा खा.सोनवणेंकडून उल्लेख

बीड: 'बीडला रेल्वे आलीच पाहिजे', ही घोषणा लहानपणी ऐकली होती. बीड जिल्ह्यातील अनेकांनी रेल्वेसाठी आंदोलने केली, ३०० आंदोलकांवर गुन्हे दाखल झाले. यातील काहींनी जेल भोगले. प्रकल्प मंजुरीनंतर मागील बारा वर्षात केवळ ९९ किलोमिटर रेल्वे मार्ग पुर्ण झाला होता, मात्र आपण खासदार झाल्यानंतर बारा महिन्यात ६७ किलोमिटर मार्गाचे काम पुर्ण करून पुढे वडवणीपर्यन्त हायस्पीड ट्रायल रन यशस्वी झाला आहे. या कामासाठी सततचा पाठपुरावा आवश्यक असून मी जनतेचा सालगडी म्हणून हे काम करत आहे. आपल्याला रेल्वेचे श्रेय अजिबात घ्यायचे नसून आज रेल्वे बीडला येत असून जिल्ह्यासाठी हा आनंदाचा क्षण असल्याचा उल्लेख खा.बजरंग सोनवणे यांनी म्हटले.

बीड येथील शासकिय विश्रामगृह येथे पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी खा.बरजंग सोनवणे यांच्यासोबत राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, पिंटू ठोंबरे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना खा.सोनवणे म्हणाले, आजपासून बीडला रेल्वे सुरू होत आहे. बीडला रेल्वे यावी, यासाठी अनेकानी योगदान दिले आहे. रेल्वेसाठी मोठा संघर्ष करावा लागलेला आहे. बीड रेल्वेसाठी लढा देणारे सर्व स्वातंत्र्य सैनिक, रेल्वे कृति समितीमधील सर्व सदस्य यांच्या सततच्या लढ्याला यश आले. मी खासदार झालो त्यावेळी रेल्वे अंमळनेरपर्यंत आलेली होती. खासदार म्हणून शपथ घेतल्यानंतर पहिले प्राधान्य हे रेल्वेला दिले. पहिली बैठकही रेल्वे विभागाची घेतली. प्रकल्पासाठी येत असलेले अडथळे व उपाययोजना बाबत माहिती घेतली. संसदीय पक्षाच्या नेत्या खा.सुप्रिया सुळे यांचे आवश्यक ठिकाणी मार्गदर्शन घेत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव व रेल्वे बोर्ड अध्यक्ष सतिषकुमार यांच्याकडे सतत पाठपुरावा करत रेल्वेबाबतीत येणाऱ्या अडचणी सांगून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले. मुख्यमंत्री



फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेही सहकार्य लाभले. मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्मवीर मीना व त्यांच्या विभागाशी सातत्याने बैठका घेत संपर्क ठेवला. रेल्वेमंत्री, रेल्वे बोर्ड, मध्य रेल्वे मुंबई व आहिल्यानगर कार्यालय येथे वारंवार बैठका घेतल्या. ठेकेदार कोण आहे हे न पाहता काम गतीने होण्याकडे लक्ष दिले, यामुळे रेल्वेकामाला गती आली. अडचणीच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेटी व स्थानिक नागरिकांशी चर्चा करून मार्ग काढला. हे करताना तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ, अविनाश पाठक आणि आता विवेक जॉन्सन तसेच रेल विभागाचे आर.के.यादव, लोळगे व त्यांचा संपूर्ण स्टाफ यांनी चांगले काम केले. रेल्वे मंजूरी मिळाली तेव्हा आपण या प्रक्रियेत नव्हतो, आंदोलनातही नव्हतो, परंतु खासदार म्हणून मला रखडलेल्या कामांचा पाठपुरावा करून त्या कामांना गती देता आली. याच पाठपुराव्यामुळे बारा महिन्यात वडवणीपर्यन्त काम पुर्ण होऊ शकले. बीड जिल्ह्याला रेल्वेची भेट देणे हे माझ्यासाठी एक शेतक-याचा मुलगा म्हणून केवळ काम नाही, तर आयुष्यभर लक्षात राहणारा आनंदाचा क्षण आहे, असे खा.बजरंग सोनवणे म्हणाले.

### रेल्वेची चुकीच्या पध्तीतीने कामे

आपण खासदार होण्याआधी झालेली रेल्वेची कामे चुकीच्या पध्दतीने झालेली आहेत. अनेक ठिकाणी रेल्वेपुलाखाली पाणी साचते. अनेक ठिकाणी पुलच चुकीचे बांधले. तर हायस्पिड चाचणी होईपर्यत विद्यूतीकरणाच्या कामांकडे दुर्लक्ष करणे, असे प्रकार झालेले आहेत. परंतु माझ्या कार्यकाळात चुकीची कामे होणार नाहीत, यासाठी मी लक्ष ठेवून आहे, असे खा.बजरंग सोनवणे म्हणाले.

**२०२६ मध्ये काम पुर्ण**

जिल्ह्यात १० ठिकाणी नवीन रेल्वे ओव्हरब्रिज व अंडरपास लवकरच सुरू करण्यात येतील. बीड शहरातील बार्शी नाका येथे रेल्वे थांब्याचा प्रस्ताव पुढे पाठविला आहे.बीड शहराजवळील ढोले वस्ती येथे अंडरपासचे काम निश्चित करण्यात येईल. रेल्वेमार्गाचे काम गतीने सुरू असून मार्च २०२६ पर्यंत अहिल्यानगर-परळी रेल्वे मार्ग सुरू होईल.

**खा.सोनवणेंकडून यांचाही उल्लेख**

बीड रेल्वेची पहिली मागणी तत्कालीन खासदार गंगाधर आप्पा बुरांडे यांनी केली. स्व.खा. केशरकाकु क्षीरसागर व स्व.गोपीनाथराव मुंडे यांनी लोकसभेत वारंवार आवाज उठवला. रेल्वे कृती समिती, स्वातंत्र्यसैनिक, आणि जनआंदोलन करणारे सर्व मान्यवर आदिंचा संघर्ष यशस्वी झाला. आतापर्यंत ३०० आंदोलनकर्त्यांवर गुन्हे दाखल झाले. सर्वांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे बीडला रेल्वे आली आहे, असा उल्लेख खा.सोनवणे यांनी केला.

**ओल्या दुष्काळाची केली मागणी**

बीड जिल्ह्यात दि.१४-१५ आणि १६ रोजी सलग तीन दिवस अतिवृष्टी झाली आहे. परिणामी, शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून आता सरकारने पंचमाने न करता बसता शेतकऱ्यांना सरसकट मदत करावी. मी अतिवृष्टीग्रस्तांची भेट घेतली असून त्यांचे दुख: पाहवत नाही, असेही खा.सोनवणे म्हणाले.

## अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत कारण्याची डॉ जितेंद्र ओव्हाळ यांची मागणी

बीड -बीड जिल्ह्यात चारही बाजूने मुसळधार पाऊस पडला आहे यामुळे शेतकऱ्यांचं मोठया प्रमाणात नुकसान झालं याची तातडीने दखल घेऊन नुकसानीचे पंचनामे थेट बांधावर जाऊन कारण्याची मागणी डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंच अध्यक्ष डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी मंगळवारी शासनाकडे केली

या बाबतीत डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी सांगितले की सोयाबीन बाजरी कापूस ही पिकं जमीनदोस्त झाली आहेत जबाबदार अधिकाऱ्यांनी पंचनामे करण्यासाठी चालढकल न करता



थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पहाणी करावी व नुकसान भरपाई तातडीने देण्याची व्यवस्था करावी त्याचं बरोबर अनेक ठिकाणी लोकांच्या घरात पाणी जाऊन नुकसान झाले याचीही पहाणी करून नुकसानभरपाई देण्यात यावी अशीही मागणी करत नुकसानभरपाई तातडीने न दिल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंचाकडून सचिन साळवे रमेश थोरात राकेश शिरसाठ दया वाघमारे संजय वाव्हल विकास वाव्हल लालासाहेब भोले विनोद इनकर राहुल गायकवाड सुभाष चित्रे विशाल वाळेकर अंबादास सोनवणे अमोल सिरसाट तुषार भालेराव हिरामण काळे यांनी मंगळवारी दिला आहे

# केज तालुक्यासह बीड जिल्ह्यात मुसळधार पावसाचा हाहाकार ; शेतीचे प्रचंड नुकसान

## महाएनजिओ फेडरेशनचे जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे यांची सरकारकडे आर्थिक मदतीची मागणी

बीड/प्रतिनिधी

मागील तीन दिवसा पासून बीड जिल्ह्यात मुसळधार पावसाने थैमान घातले असून, विशेषतः केज तालुका आणि आसपासच्या भागात शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.पावसामुळे उभ्या पिकांवर पाणी साचल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून,शेतकरी अडचणीत आले आहेत

या पार्श्वभूमीवर महा एनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्यचे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे यांनी राज्य सरकारकडे शेतकऱ्यांना तातडीने हेक्टर १ लक्ष रुपये आर्थिक मदत जाहीर करण्याची जोरदार मागणी केली आहे. शेतीचे झालेले नुकसान पाहता प्रशासनाने तातडीने पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई जाहीर करावी. फक्त आश्वासने



न देता शेतकऱ्यांच्या खात्यावर हेक्टरी १ लक्ष रुपये थेट मदत जमा होणे अत्यावश्यक आहे, असे बाजीराव ढाकणे यांनी सांगितले.

बीड जिल्ह्यातील अनेक भागांत सोयाबीन, कापूस,भाजीपाला, मूग,ऊस आणि तूर यासारखी पिके पाण्याखाली गेली आहेत.काही ठिकाणी मातीचा थर वाहून गेल्याने शेताची गुणवत्ता देखील खराब झाली आहे.यामुळे आगामी हंगामावरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे जनावरे, शेती उपकरणे, साठवलेले धान्य व खताचे साठे देखील नष्ट झाले आहेत.अनेक कुटुंबांना आपल्या शेतवस्त्यांवरून गावात स्थलांतर करावे लागले आहे.सरकारने तातडीने उपाययोजना कराव्यात

# घाटनांदूर- श्रीगोंदा- दौंड रेल्वे मार्गाला गती देण्यासाठी रेल्वे बोर्डाचे सल्लागार डॉक्टर

## आदित्य पतकराव यांनी घेतली रेल्वे मंत्रालयात घेतली अधिकाऱ्या सोबत पाठपुरावा बैठक

आंबजोगाई (प्रतिनिधी)

घाटनांदूर- श्रीगोंदा- दौंड या आंबजोगाई - केज -मांजरसुंबा - पाटोदा - जामखेड- कर्जत - राशीन करांच्या रेल्वेच्या स्वप्न पूर्ती साठी रेल्वे बोर्डावरील सल्लागार व अंबाजोगाईचे भूमिपुत्र डॉक्टर आदित्य पतकराव यांनी काल रेल्वे मंत्रालयात पाठपुरावा बैठक घेऊन या रेल्वे प्रकल्पाला गती देण्यासाठी झोनल रेल्वे सदस्य (मध्य रेल्वे), प्रिन्सिपल सेक्रेटरी (झझड) गती शक्ती श्री. एन.सी. करमाळी व संयुक्त संचालक श्री. रवि शर्मा यांची भेट घेऊन प्रकल्पावर सविस्तर चर्चा केली व रेल्वे मंत्री मा ना अश्विनी बन्सल यांना निवेदन सादर केले असून बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, राज्यसभेच्या खासदार सौ रजनीताई पाटील, अहिल्या नगरचे खासदार निलेश लंके सह या मार्गांवरील सर्व लोकप्रतिनिधिने आता या मार्गासाठी पाठपुरावा करन्याची आवश्यकता आहे.

केंद्र सरकार आणि रेल्वे खात्याच्या विचाराधीन असलेला घाटनांदुर अंबाजोगाई - केज- नेकनूर- मांजरसुंबा- पाटोदा - जामखेड -कर्जत- श्रीगोंदा दौंड हा रेल्वे मार्ग रेल्वे खात्यासाठी अत्यंत कमी खर्चात आणि जास्तीचे आर्थिक उत्पन्न देणारा रेल्वे मार्ग ठरणारा असून भविष्यामध्ये या पंचक्रोशीतील प्रवाशांना केवळ मुंबई पुणेच नव्हे तर राज्याच्या कानाकोपऱ्यात जाण्यासाठी आणि राज्यातील नावारूपाला आलेल्या देवस्थानला जाण्यासाठी भाविकांना अत्यंत सोयीचे होणार आहे.

रेल्वे बोर्डावर सल्लागार म्हणून आंबजोगाईचे भूमिपुत्र डॉ आदित्य पतकराव यांनी मागील २ महिन्या पूर्वी झालेल्या रेल्वे बोर्डाच्या बैठकीत या रेल्वे मार्गाचा विषय चर्चेत आणलेला होता आणि काल १५ सप्टेंबर रोजी त्यांनी रेल्वे मंत्रालयात पाठपुरावा बैठक घेऊन या रेल्वे प्रकल्पाला गती देण्यासाठी झोनल रेल्वे सदस्य (मध्य रेल्वे), प्रिन्सिपल सेक्रेटरी (झझड) गती शक्ती श्री. एन.सी. करमाळी व संयुक्त संचालक श्री. रवि शर्मा यांची भेट









घेऊन प्रकल्पावर सविस्तर चर्चा केली व रेल्वे मंत्री मा ना अश्विनी बन्सल यांना निवेदन सादर केले.

या निवेदनात त्यांनी नमूद केले आहे कि २०१५ पासून प्रलंबित असलेल्या या प्रकल्पामुळे मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील रेल्वे संपर्क सुधारण्यास मोठी मदत होणार आहे. परळी ते अहमदनगर हा समांतर मार्ग सध्या बांधकामाधीन असून, या मार्गास घाटनांदुर-श्रीगोंदा रेल्वे लाईन जोडली गेल्यास एक महत्त्वपूर्ण कॉरिडॉर तयार होईल. यामुळे क्षेत्रातील मालवाहतूक सुलभ होईल, प्रवासाचा कालावधी कमी होईल तसेच परळी, बीड, नगर या भागातील औद्योगिक व कृषी उत्पादनांना थेट रेल्वे संपर्क मिळेल.

या वेळी झालेल्या बैठकीत अधिकाऱ्यांनी सांगितले की या प्रकल्पासाठी राज्यस्तरावर चर्चा, मंत्रिमंडळात मान्यता तसेच विविध प्रशासकीय औपचारिकता पूर्ण करणे आवश्यक आहे. या प्रकल्पाचा अंदाजित खर्च सुमारे २,००० ते ३,००० कोटी रुपये असून निधीची तरतूद केंद्र व राज्य सरकार यांच्या समन्वयाने करावी लागेल.डॉ. पतकराव यांनी मंत्रालयासमोर या प्रकल्पाचे प्रादेशिक महत्त्व स्पष्ट करत तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली.

खासदार महोदया सह लोकप्रतिनिधींनी घाटनांदूर श्रीगोंदा रेल्वे साठी पाठपुरावा करण्याची आवश्यक घाटनांदूर-श्रीगोंदा-दौंड या रेल्वे साठी बजरंग सोनवणे, रजनी ताई पाटील निलेश लंके या खासदारांनी डॉ आदित्य पतकराव यांच्या खांद्याला खांदा लावून पंतप्रधान मा ना नरेंद्र मोदी व रेल्वे मंत्री मा ना अश्विन वैष्णव यांना साकडे घालन्याची आवश्यकता असून त्यांना या रेल्वे मार्गाचे महत्व पटवून दिले तर निश्चित हा रेल्वे मार्ग मार्गी लागल्या शिवाय आणि अंबाजोगाई केज नेकनूर मांजरसुंबा पाटोदा जामखेड कर्जत राशीन कराचं स्वप्न साकार झाल्या शिवाय राहणार नाही हे मात्र निश्चित.

# पितृपक्षात पुण्यस्मरणा निमित्त भागवत कथा !



टाळ पखावज व ग्रंथ मिरवणूक !

मानूर प्रतिनिधी ह्व

शिकून सवरून नौकरीला लागले की घरातील वयस्कर आई वडील नको वाटतात त्यांना वृध्दाश्रमात ठेवले जाते अशा वातावरणात एखादे मुल आपल्या वडीलाचे पुण्यस्मरण मोठ्या प्रेमाणे साजर करत ऋणातून उतराई होण्याचा प्रयत्न करतात असेही चित्र दिसून येते .

शिरूर येथीश रहिवाशी तथा वै .लक्ष्मण मुळे यांचे प्रथम पुण्य स्मरण त्यांचे लखुळ मुळे व शहादेव मुळे ही दोन संस्कारी मुलं श्रीमद्भागवत कथेचे आयोजन करून पितृऋणातून उतराई होण्याचा प्रयत्न करतात .

सोमवारी ग्रंथाची शोभायात्रा टाळ मृदंगाच्या गजरात काढली होती ,सोमवार पासून प्रमोद महाराज रामदासी गोंदी यांचे रसाळ वाणीतून कथा श्रवणाचा लाभ भाविक घेत आहेत .सोमवारी (२२)रोजी कथेचा समारोप सिध्देश्वर संस्थान धाकटी अलंकापुरीचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे काल्याचे किर्तनाने होणार असुन महाप्रसाद दिला जाणार आहे ,सर्वांनी कथा श्रवणाचा व महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन मुळे कुटूंबियाकडून केले आहे .

# धारूर तालुक्यात अतिवृष्टीमुळे ३६ हजार हेक्टरवरील पिकांचे मोठे नुकसान

**धारूर । प्रतिनिधी**

**धारूर तालुक्यात १४, १५ व १६ सप्टेंबर रोजी झालेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे खरिप हंगामातील कापूस, सोयाबीन, बाजरी, तुर या प्रमुख पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे.**

अनेक ठिकाणी नदी लगतचे शेतातील पिके खरडून गेले आहेत .तर कापूस सोयाबीन ही पिके भुई सपाट झाले आहे .अनेक ठिकाणी पाण्याचे लोह साचले आहेत ..



महसूल प्रशासनाने नुकत्याच केलेल्या प्राथमिक पंचनाम्यात तब्बल ६३ टक्के नुकसानीचा अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर केला आहे. या अहवालानुसार २६१२५ शेतकऱ्यांचे जवळपास ३६४०० हेक्टर क्षेत्र पावसामुळे बाधित झाले आहे. तालुक्यातील चारही मंडळांमध्ये सोमवारी अतिवृष्टी झाली होती. सलग तीन दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे नद्या, नाले तुडुंब भरून वाहू लागले होते. शेतातील पिके पाण्याखाली गेल्याने ऐन पिके पदरात पडण्याचे वेळी कुजण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मेहनतीवर अक्षरशः पाणी फिरले आहे.

कापूस व सोयाबीन हे धारूर तालुक्याचे प्रमुख नगदी पीक असून यावर्षी शेतकऱ्यांनी बियाणे, खते व औषधांवर मोठ्या प्रमाणात खर्च केला होता. मात्र अतिवृष्टीमुळे ही पिके पूर्णतः उध्वस्त होण्याच्या स्थितीत आली आहेत. बाजरी व तुर या पिकांनाही पावसाचा मोठा फटका बसला आहे .

याबाबत शेतकऱ्यांकडून शासनाकडे तातडीने मदत जाहीर करण्याची मागणी होत आहे. पिकांचे पंचनामे तातडीने पूर्ण करून भरपाई थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

दरम्यान, महसूल विभागाने नुकसानीचा प्राथमिक अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना सादर केला असून राज्य शासनाकडेही पाठविण्यात येणार आहे. प्रशासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी त्वरीत उपाययोजना करण्याची गरज आहे. अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या या संकटातून शेतकरी सावरण्यासाठी शासनाने तत्परतेने मदत करावी, अशी मागणी होत आहे.

**वरिष्ठांना अहवाल सादर**

मागील तीन दिवसाच्या कालावधीमध्ये तलाठी यांनी अनेक गावात जाऊन पहाणी केली आहे .त्यानुसार त्यांनी प्राथमिक अहवाल तहसील कार्यालयास सादर केला होता .या अहवालानुसार तालुक्यात ६३% नुकसान झाले असून ३६,४०० हेक्टर बाधित झाले आहे .वरिष्ठ आव्हाल सादर केला आहे .

-श्री .धुमक विभाग प्रमुख तहसील कार्यालय धारूर

# खोलेश्वर शिक्षक सहकारी पतपेढीची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील खोलेश्वर शिक्षक सहकारी पतपेढी ची ५१ वी सर्वसाधारण सभा जिल्हा कार्यवाह मार्गदर्शक बिपीन दादा क्षीरसागर,स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ.अतुल दादा देशपांडे, विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले,पतपेढी चे सचिव सतीश वांगे, सभेचे अध्यक्ष धनंजय जब्दे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.

सभेची सुरूवात प्रतिमा पूजनाने करण्यात आली.त्यानंतर मंचावरील मान्यवरांचे पतपेढी सभासदांच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला.या सभेत माजी सदस्य (सेवानिवृत्त शिक्षक ) उपस्थित होते त्यांचेही विशेष स्वागत करण्यात आले.त्याचप्रमाणे पतपेढी सभासद तथा लोकमान्य टिळक विद्यालय पोखरी मुख्याध्यापक अरूण पत्की सर,व लाल बहादूर शास्त्री विद्यालयाचे उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर सर यांचेही विशेष स्वागत करण्यात आले.

सभेमध्ये अहवाल वाचन सचिव सतीश वांगे यांनी केला.यावेळी सभासदांच्या सहकार्यामुळे आपल्या पतपेढीला अ दर्जा प्राप्त झाला असून या पुढील काळात असेच आपण सर्वांनी सहकार्य,सूचना, अभिप्राय द्यावे.असे आवाहनही त्यांनी केले.यानंतर पतपेढी चे अध्यक्ष धनजंय जब्दे बोलताना म्हणाले की, सर्व सभासदांनी खुप चांगला प्रतिसाद दिला त्यामुळे आपल्याला अ दर्जा मिळाला.पुढील काळात आपल्या सर्वांच्या सहकार्याने ही परंपरा चालू ठेवण्यासाठी आम्ही संचालक मंडळ कटिबद्ध आहोत.पतपेढीच्या वतीने आगामी काळात आजपर्यंत सहकार्य केलेल्या मान्यवर सभासदांचे एकत्रीकरण करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला असून पतपेढीच्या माध्यमातून शिक्षकांसाठी नवनवीन योजना आगामी काळात राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.पतपेढीच्या सभासद भगिनींनी आवर्ती ठेव (ठऊ) योजनेला दिलेल्या प्रतिसादाबद्दल ऋण व्यक्त केले.

सभेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित डॉ.अतुल दादा देशपांडे यांनी अ दर्जा मिळाल्याबद्दल सर्व संचालक मंडळाचे अभिनंदन करून यात नक्कीच सातत्य ठेवावे ही प्रमुख अपेक्षा व्यक्त केली. तसेच काही मौलिक सुचना सुध्दा दिल्या..

दुसरे प्रमुख मार्गदर्शक जिल्हा कार्यवाह बिपीन दादा क्षीरसागर म्हणाले की,पन्नास वर्ष हे व्यक्तींसाठी फक्त वय असते.आर्थिक क्षेत्रात काम करणाऱ्या पतपेढी ची ही खुप मोठी उंची असते.यानिम्मित्ताने या पतपेढी साठी कार्य केलेल्या व्यक्तींच्या कार्याचा आढावा घेणारी एखादी पुस्तिका प्रकाशित करावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले यांनीही यावेळी उपस्थित सभासदांना मार्गदर्शन केले त्यांनी पतपेढीची सभासदांना शुभेच्छा दिल्या.ही सभा आनंदात पार पडली याबद्दल आनंदही व्यक्त केला.या सभेचे सुत्रसंचलन ज्योती उत्तमराव शिंदे व सभेचे इतिवृत्त ज्योती किसनराव शिंदे यांनी केले प्रास्ताविक रुपाली मुळे आभार उपाध्यक्षा सुरेखा काळे यांनी मानले.

## अतिवृष्टीने पिकांचे नुकसान झाल्यामुळे तात्काळ सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी ... शेषराव जगताप



वडवणी /प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे वडवणी तालुक्यातील शेतकरी अक्षरशः उघड्यावर आला आहे. पिकांचे अतोनात नुकसान, घरांची पडझड, तुटलेला गावांचा संपर्क शेतकरी कष्टाने उभं केलेलं पीक आज डोळ्यांसमोर वाहून जाताना त्याच्या डोळ्यात अश्रू आहेत...

या भीषण परिस्थितीत आज वडवणी तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे करून , हेक्टरी ५०,०००/- मदत शासनाने तात्काळ द्यावी, ही आमची ठाम मागणी आहे.

अन्यथा शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी आम्ही रस्त्यावर उतरून तिव्र आंदोलन करण्यास मागेपुढे पाहणार नाही.याप्रसंगी श्री शेषराव बापू जगताप ( नगराध्यक्ष वडवणी), बजरंग आप्पा साबळे( तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस ), विकास मुंडे ( तालुकाध्यक्ष युवक राष्ट्रवादी काँग्रेस ), ज्येष्ठ नेते श्री भारत दादा जगताप, श्री महादेवराव अंबुरे, शहराध्यक्ष गणेश म्हेत्रे,संचालक अभिमान कदम, सतीश खोटे, शाम जाधव, दिनकर करांडे, कारभारी वीर, वैभव मस्के सह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वडवणीचे पदाधिकारी उपस्थित होते..शेतकऱ्यांच्या वेदना आमच्या वेदना आहेत! शेतकऱ्याच्या हक्कासाठीचा हा लढा अखेरच्या न्याय मिळेपर्यंत सुरू राहील.

# महाविकास आघाडीचे अर्धनग्न आंदोलन प्रशासनाला दिले निवेदन



वडवणी /प्रतिनिधी

आज दिनांक १६/०९/२०२५ मंगळवार रोजी सकाळी ११ वा.वडवणी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वे पुला खालील साचलेले पाऊसाचे पाणी तात्काळ काढण्या संदर्भात महाविकास आघाडीच्या वतीने अर्धनग्र आंदोलन केले साचलेल्या पाण्यात उतरून अर्धनग्र अवस्थेत बसून आंदोलन केले यावेळी तहसीलदार साहेब यांनी आंदोलन ठिकाणी भेट देऊन निवेदन घेतले.रेल्वे खालील पुलाच्या पाण्युळे डोंगर पट्ट्यातील गावांना येण्यासाठी रस्ता आहे, यामुळे रहदारीच्या रस्त्यावर वाहतूक व्यवस्था कोलमडली होती.हजोरो विध्यार्थी ची शाळा येणे बंद झाले.हे पाणी तात्काळ काढून देऊन व कायम सोयरुपी पर्याय काढावा अशी मागणी केली.यावेळी महाविकास आघाडी चे शिवसेना तालुका प्रमुख विनायक मुळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वडवणी तालुका अध्यक्ष महादेव जमाले , राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते प्रा.जेधे सर, भास्कर उजगरे, युवराज शिंदे, संजय धपाटे, दत्तात्रय जमाले, असंख्य कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

## पगार द्या हो पगार! ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ; आम आदमी पार्टीकडून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

जालना /प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांवर गेल्या काही महिन्यांपासून थकित वेतनामुळे उपासमारीची वेळ आली आहे. या गंभीर परिस्थितीवर लक्ष वेधण्यासाठी आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अंकुश गोविंदराव कांबळे यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना यांना निवेदन सादर केले.या निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, एप्रिल व मे २०२५ या दोन महिन्यांचे वेतनाचे निधी जून-२०२५ पासून जिल्हा परिषदेकडे जमा असूनही, आजपर्यंत जिल्ह्यातील एकाही ग्रामपंचायत कर्मचाऱ्याला वेतन मिळालेले नाही. यामुळे ग्रामीण विकासाचा कणा मानल्या जाणाऱ्या या कर्मचाऱ्यांना प्रचंड आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे.ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये काम करणारे कर्मचारी गावाच्या विकासासाठी दिवस-रात्र झटत असताना त्यांनाच वेतनाविना कुटुंब चालविण्याची वेळ येणे ही अत्यंत दुर्दैवी बाब असल्याचे कांबळे यांनी सांगितले.यामुळे कर्मचाऱ्यांची कुचंबणा होत असून प्रामाणिक कष्टाची अवहेलना होत आहे.

कांबळे यांनी पुढे सांगितले की कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काचे वेतन न मिळणे ही अन्यायकारक बाब असून प्रशासनाने तात्काळ उपाययोजना करून सर्व कर्मचाऱ्यांना थकित वेतन अदा करावे.अन्यथा आम्हाला तीव्र आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल.आम आदमी पार्टीने सादर केलेल्या या निवेदनामध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित आदेश निर्गमित करून जालना जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वेतनाचा लाभ मिळवून द्यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

## तरुणाचा फक्त एक मेसेज अन् मा.ना.पंकजाताई मुंडे यांची तत्परता..

दुर्गम भागातील नागलवाडीच्या स्मशानभूमीचा प्रश्न तातडीने लावला मार्गी

बीड । शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागातील डोंगरमाथ्यावर वसलेले शेवटचे दुर्गम व दुष्काळी गाव म्हमजे नागलवाडी. या गावात स्मशानभूमीचे शेड नव्हते. त्यामुळे गावकऱ्यांना अनेकदा मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत होते. भर पावसात चिखलामध्ये मृतदेहाची मोठ्या प्रमाणात हेळसांड होऊन अंत्यविधीसाठी आलेल्या नागरिकांचे देखील हाल होत होते. स्मशानभूमी अभावी मरणानंतरही जणू मृतदेहाला नरकयातना सहन करावी लागत होत्या.

याच पार्श्वभूमीवर नागलवाडी गावच्या एका युवकाने मंत्री पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांना मेसेज करून स्मशानभूमीची समस्या सांगितली. ताईसाहेबांनी तातडीने लगेचच संबंधित तरूणाला फोन लावून संवाद साधला, आस्थेवाईकपणे त्यांचा प्रश्न समजून घेतला आणि तेवढ्याच तत्परतेने आपल्या आमदार फंडातून स्मशानभूमीसाठी निधी मंजूर करून संबंधितांचा प्रश्न मार्गी लावला.कायम सर्वसामान्यांचे सामाजिक प्रश्न मार्गी लावणाऱ्या ना.पंकजा ताईंची पुन्हा एकदा प्रचिती आली.

# आष्टी आणि शिरूर तालुक्यातील पीक नुकसानीचे सरसकट पंचनामे करावेत

आ.सुरेश धस यांच्या प्रशासनाला सूचना

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी व शिरूर तालुक्यामध्ये नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांनी आष्टी तहसिल कार्यालयात तातडीची बैठक घेऊन अतिवृष्टीमुळे पीक नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्यासंबंधी महत्त्वपूर्ण सूचना जिल्हा प्रशासनास दिल्या आहेत.

गेल्या दोन - तीन दिवसापासून झालेल्या जोरदार पावसामुळे आष्टी व शिरूर (कासार) तालुक्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा तसेच उपाययोजना करण्याबाबत स्वतः शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देऊन त्यांना मदतीबाबत अस्वस्थ करून नद्यांना आलेल्या अचानक पुरामुळे अडकलेल्या लोकांना त्यातून बाहेर काढून दि. १६ रोजीच रात्री ७ वा. आष्टी तहसिल कार्यालयात प्रशासनाची बैठक घेतली. या बैठकीस उपविभागीय अधिकारी वसिमा शेख, तहसीलदार वैशाली पाटील, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांच्यासह सर्व विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत आ. सुरेश धस म्हणाले, अनेक गावांत नदी नाल्याचे पाणी घरात शिरल्यामुळे घरांची पडझड झाली असून नदीकाठच्या जमीनी खरडून गेल्या आहेत. त्याबाबत तात्काळ पंचनामे करावेत. ज्या गावातील पूलावर पाणी जाऊन गावांचा संपर्क तुटला आहे तेथील नागरिकांना पुलावरून जाऊ नये, असे आवाहन करावे तसेच पुलांच्या तात्काळ दुरुस्तीबाबत प्रस्ताव सादर करावेत. आष्टी तालुक्यांतील पाझर तलाव, साठवण तलाव, सिंचन तलाव, पूर्ण क्षमतेने भरून जात आहेत. काही तलाव फुटले आहेत तसेच काही तलावातील पाणी सांडवा फोडून काढून देण्यात आले आहेत. सदरील तलावांच्या दुरुस्तीचा, पडझड झालेल्या कोल्हापुरी बंधारे व सिमेंट नाला तसेच जिल्हा परिषद शाळेमध्ये पाणी जाऊन शाळेचे नुकसान झालेले आहे, अशा




शाळांचे दुरुस्तीचे प्रस्ताव सादर करावे व शाळेची इमारत धोकादायक असल्यास वर्ग इतरत्र भरवण्यात यावेत. गावा गावांना जोडणारे रस्ते पावसामुळे खचल्यामुळे गावांचा संपर्क तुटला आहे. त्या रस्ते दुरुस्तीचा प्रस्ताव सादर करावा. अनेक गावांतील घरामध्ये पाणी जाऊन नागरिकांचे नुकसान झाले आहे अशा नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करून त्यांची निवासाची व भोजनाची व्यवस्था करावी. पोल पडल्यामुळे व तार तुटल्यामुळे विद्युत पुरवठा खंडित झाला आहे अशा गावांमध्ये तात्काळ विद्युत पुरवठा चालू करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. बंद असलेल्या बसेस चालू करून नागरिकांची गैरसोय दूर करावी. नाल्या जेसीबीव्दारे खुल्या करून पाणी काढून देणे व नाल्या दुरुस्ती कराव्यात शहरातील गटारी तुंबल्यामुळे पाणी शहरातील मुख्य रस्त्यांवर आले आहे. या गटारी जेसीबीव्दारे खुल्या करण्यात याव्यात. अतिवृष्टीमुळे रोगराई (डेंगू मलेरिया) पसरण्याची भीती आहे. तरी नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून उपाययोजना कराव्यात सर्व विभागाच्या एकत्रित नुकसानीचा मदत मिळणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी बीड यांनी शासनाकडे तत्काळ सादर करावा, अशी सूचना देखील आमदार सुरेश धस यांनी केली आहे.

